एक अगरबत्तीचा सुवास दरवळेल दूरवर....
इंडियन कस्तुरी
फ्लारिश फ्रॅग्रनस् कं. ची प्रिमियम मसाला अगरबत्ती
५० व २५० ग्रॅम बॉक्स पॅकिंग मध्ये उपलब्ध
Indian Kasturi
तसेच केशरचंदन, शाहीऊद, हिना कस्तुरी, महालक्ष्मी, कस्तुरीचंदन अगरबत्ती व धुप
शुभलाभ (६ ईन १ पाऊच रु. ६० चा ५० मध्ये)
कापुर, शेंदूर, अत्तर, धुप, व वजनावर सुटी अगरबत्ती होलसेल व रिटेल साठी
सुवासीक पुजाकीट, गिफ्टसह सवलतीत उपलब्ध
स्कीम ३१ ऑगस्ट २५ पर्यंत उपलब्ध
केवल अगरबत्ती
आडते बाजार, अहिल्यानगर.

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

SONI TILES Since 1965
AND MARBLE INDUSTRIES
Opp. Munot Estate, Station Road, Ahmednagar. Tel. : (0241) 2418720
Mob. 9372497999
Wholesalers & Manufacturers of - Ceramic Wall & Floor Tiles, Vitrified Tiles, Paving Blocks, Marble & Granite
सोनी टाईल्स ॲण्ड मार्बल इंडस्ट्रिज

रजि नं. ११४३९–५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, बुधवार दि. २०.०८.२०२५ | अंक नं. १२० | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020

स्मार्ट असो वा मार्ट..मिल असो वा मॉल...
सर्वात स्वस्त देणार फक्त राजपाल !
आला रे आला राजपाल सेल आला..!
खरेदी | खरेदीवर पॉइंट | पॉइंटसवर गिफ्ट
30 ते 70% डिस्काउंट सेल
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
संगमनेर (02425) 222226
अ. नगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090

उद्या
गुरूपुष्यामृतयोग
शुभमुहूर्त सुवर्णखरेदीचा..
गुरूपुष्यामृतयोगा निमित्त 0.5 ग्रॅम ते 50 ग्रॅम वेगवेगळ्या वजनामध्ये वेढणी व क्वाईन हजर स्टॉकमध्ये उपलब्ध.
चंदुकाका ज्वेल्स
सोनेरी नातं..
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02

# महानगरपालिकेचे 'माहिती सुविधा केंद्र' नागरिकांसाठी बनलेयं असुविधेचे ठिकाण

## ना पार्किंगची व्यवस्था ना नागरिकांना उभे राहण्यासाठी जागा; त्यातच शेजारील स्वच्छता गृहाची दुर्गंधी

नगर – महापालिकेचे जुन्या इमारतीसमोरील माहिती सुविधा केंद्र नागरिकांसाठी असुविधेचे ठिकाण बनले आहे. या ठिकाणी येणाऱ्या नागरिकांना वाहने उभे करण्यासाठी पार्किंगची व्यवस्था नाही, कार्यालयातील जागा कर्मचाऱ्यांसाठी तसेच नागरिकांसाठीही अपुरी पडत असल्याने नागरिकांना उभे राहायलाही जागा मिळत नाही. त्यातच या केंद्राशेजारी असलेल्या स्वच्छतागृहाची व्यवस्थित देखभाल होत नसल्याने नागरिकांना आणि कर्मचाऱ्यांनाही दुर्गंधीचा मोठा त्रास होत आहे.


या केंद्रात येणाऱ्या नागरिकांना वाहने रस्त्याच्या कडेलाच उभी करावी लागत आहेत, त्यामुळे या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडी होवून नागरिकांमध्ये वाद होतात. या माहिती सुविधा केंद्रात दररोज शेकडो नागरिक विविध कारणास्तव येत असतात, मात्र येथील कार्यालयीन जागा अतिशय लहान व अपुरी आहे. त्यामुळे कधी कधी तर नागरिकांना उभे राहायलासुद्धा जागा मिळत नाही. या केंद्रात नवीन तंत्रज्ञान नाही, त्यामुळे अजूनही जुन्या पारंपारिक पद्धतीने येथील कारभार सुरु आहे. शिवाय केंद्राशेजारीच महापालिकेचे सार्वजनिक शौचालय आहे. व्यवस्थित देखभाल होत नसल्याने नागरिकांना आणि कर्मचाऱ्यांनाही त्या दुर्गंधीचा त्रास होत आहे.

या समस्येकडे माहिती अधिकार कार्यकर्ते नितीन थोरात यांनी आयुक्तांना निवेदन देवून त्यांचे लक्ष वेधले आहे. आयुक्तांनी या केंद्राची समक्ष पाहणी करून सदर केंद्र अत्याधुनिक सोयी, सुविधा असलेल्या प्रशस्त जागेत स्थलांतरीत करावे, अशी मागणीही त्यांनी केली आहे.

### ऑनलाईन पैसे स्विकारण्याची सुविधाही नाही

या केंद्रात आलेल्या नागरिकांना विविध अर्ज, दाखल्यांसाठी शुल्क भरावे लागते. मात्र या केंद्रात ऑनलाईन पैसे स्विकारण्याची सुविधाही नाही. त्यामुळे नागरिकांना रोख स्वरूपातच पैसे भरावे लागतात. पैसे सुट्टे नसल्यास नागरिकांना ते सुट्टे पैसे मिळविण्यासाठी परिसरात भटकंती करावी लागत आहे. सध्या सर्वच ठिकाणी ऑनलाईन पैसे स्विकारण्याची सुविधा आहे. मात्र या ठिकाणी ती नसल्याने नागरिकांची मोठी अडचण होते. त्यामुळे ही सुविधा ही या माहिती सुविधा केंद्रात सुरु करावी, अशी मागणीही थोरात यांनी केली आहे.

# भंडारदरा धरण भरले



अकोले – भंडारदरा धरण २० ऑगस्ट रोजी पहाटे ३ वाजता भरले. भंडारदरा पाणलोट क्षेत्रात मुसळधार पाऊस पडत असल्यामुळे धरणातून पुन्हा मोठ्या प्रमाणात पाणी सोडण्यास सुरुवात झाली आहे.

सकाळी ६ वाजता धरणाच्या स्पीलवे मधून ११४०६ क्युसेक तर वीज निर्मितीसाठी ८५० क्युसेक असा १२ हजार २३१ क्युसेक विसर्ग सुरु होता. सकाळी ८ वाजता विसर्ग २०७६३ क्युसेक करण्यात आला आहे. भंडारदरा धरणात १०७६३ द.ल.घ.फू. पाणीसाठा ठेऊन धरणात जमा होणारे उर्वरित पाणी सोडून देण्यात येणार आहे, अशी माहिती धरणाचे शाखा अभियंता प्रविण भांगरे यांनी दिली.

सकाळी भंडारदरा धरणातून मोठ्या प्रमाणात विसर्ग सुरू करण्यात आला आहे. टप्याटप्प्याने त्यात वाढ केली जाणार आहे. भंडारदरा धरणातून मोठ्या प्रमाणावर विसर्ग सुरू असल्यामुळे निळवंडे धरणाच्या पाणी पातळीत वाढ सुरू आहे. सकाळी निळवंडे धरणाचा पाणीसाठा ७२६६ दलघफू होता. धरणात मोठ्या प्रमाणात पाण्याची आवक सुरू आहे. त्यामुळे निळवंडे धरणातूनही पाणी सोडले जाण्याची शक्यता आहे.

प्रवरा नदीकाठच्या गावांना नदीपात्रातील मालमत्ता, चीज वस्तू, वाहने, पशुधन, शेती अवजारे व इतर मनुष्य उपयोगी संसाधने सुरक्षित स्थळी स्थलांतरित करावीत. नदीपात्रात प्रवेश करु नये. कुठलीही जीवित वा वित्तहानी होणार नाही याबाबत दक्षता घेण्यात यावी, असे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

महाराष्ट्रातील सर्वात स्वस्त कापड मॉल महावीर मॉल
स्वस्त म्हणजे नक्की काय असतं..?
रेनकोट आणि छत्री महोत्सव
पावसाळा सुरु होण्या पूर्वी पावसाळ्याची तयारी करुया
झील आणि वर्षा रेनकोटवर सरसकट 20% डिस्काउंट
१० जून पर्यंत रेनकोट खरेदी करा आणि अधिकचा डिस्काउंट मिळवा..
सर्व फ्रेश स्टॉक, नवीन डिझाईन रेडी स्टॉकमध्ये उपलब्ध
* सर्व शालेय मुलांचे सॅक वाले रेनकोट मिळतील.
* लेडीज रेनकोट मिळतील.
अधिक माहितीसाठी भेट द्या..
श्री महावीर कलेक्शन
मारुती मंदिरा समोर, मर्चंट बँके जवळ, मार्केटयार्ड, अ.नगर. Mo. 98222 52001

पुरुषांसाठी ब्रॅण्डेड शर्ट
(3XL, 4XL पर्यंत) Rs.550/- ला 1 Rs.1500/- ला 3
(2XL, 3XL, 4XL पर्यंत) Rs.400/- ला 1 Rs.1100/- ला 3
जिन्स व फॉर्मल पॅन्ट साईज ३४ पर्यंत Rs.1200/- ला 3 व साईज 36 पासून पुढे Rs.1500/- ला 3, मर्यादित स्टॉक
अहिल्यानगर शहरातील भव्य मॉल
पुरुषांसाठी सर्व काही
शुभ मॉल
मयुरी लेडिज मॉलच्या वर

सुवर्ण खरेदीची पुरातन मुहूर्तमेढ
S.G.K. 88th वर्धापन उत्सव
शुभमुहूर्तांची शुभसुरुवात म्हणजे सोनेखरेदी आणि त्याला साद घालणारा गुरूपुष्यामृतचा मुहूर्त. याच निमित्ताने आम्ही 88 वर्षांपासून सज्ज आहोत सर्वोत्तम कलाकुसर, आकर्षक डिझाईन्स, नवनविन फॅशन्स सह आपल्याला खुलविणारा आमचा वर्धापन दिन महोत्सव
* योजना – 25 जुलै ते 22 ऑगस्ट 2025 पर्यंत वैध
दररोज एका भाग्यवंताला मजुरीवर 88% सुट
हिरे व प्लॅटिनमच्या दागिन्यांच्या मजुरीवर 50% सुट
सोने व चांदीच्या दागिन्यांच्या मजुरीवर 25% सुट
Divine Diamond Festival मध्ये सहभागी व्हा व लाखोंची बक्षिसे जिंका
T&C Apply*
विश्वास, परंपरा आणि गुणवत्तेचं प्रतीक
स्थापना 1937 S.G.K. ज्वेलर्स, अहिल्यानगर
सत्यम् शिवम् सौंदर्यम्
एस.जी. कायगांवकर सुवर्ण क्षणांसाठी
सराफ बाजार 2341333, 9890032323 | सावेडी 2341335, 9511902345

Follow Us On :
ग्रॅव्हिटी शॉवरने प्रत्येक बाथ बनेल अधिक स्पेशल...
आजच संपर्क करा!
ABHAY SALES CORPORATION & HARDWARE
Satbhai Mala, Shop No 8, Delhi Gate Rd, Near Gajanan Hospital, Ahilyanagar
9145008009 / 9822542011

CERTIFICATE COURSE IN ADVANCE ACCOUNTING
COURSE DETAILS
COMPUTER APPLICATION
ADVANCE ACCOUNTING
TAXATION, BANKING
AUDITING
100% JOB ASSISTANCE
Experience Faculties | 1 Lac + Students Trained | Job Assistance
CAA IN YOUR CAREER
IS NOT JUST A COURSE BUT A GREAT INVESTMENT
An ISO 9001:2015 Certified
DISHA COMPUTER INSTITUTE
Delhi Gate Branch 9371051769
Old ST stand Branch 9371151769
Pipeline Branch 7447761769

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# माजी सैनिकांसाठी राजकीय आरक्षण द्या

## त्रिदल, जय हिंद व दि व्हॅलेनटस माजी सैनिक संघाच्या वतीने निवेदनाद्वारे मागणी; राज्य सरकार व राज्यपालांकडेही पाठपुरावा करणार

नगर - जिल्ह्यातील त्रिदल सैनिक सेवा संघ, जय हिंद फाऊंडेशन व दि व्हॅलेनटस माजी सैनिक संघाच्या वतीने माजी सैनिक, शहीद परिवार व सैनिक परिवारांचे प्रश्न सोडविण्यासाठी राजकीय आरक्षणाची मागणी राज्य सरकारकडे करण्यात आली आहे. या संदर्भातील निवेदन निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब गिते यांना देण्यात आले. यावेळी त्रिदल सैनिक सेवा संघाचे गोवर्धन गर्जे, संजय म्हस्के, मारुती ताकपेरे, आबासाहेब कांडेकर, जय हिंद फाऊंडेशनचे शिवाजी पालवे, संजय पाटेकर, भाऊसाहेब पालवे, दि व्हॅलेनटस माजी सैनिक संघाचे भारत खाकाळ, भगवान डोळे आदी उपस्थित होते.

महाराष्ट्रातील माजी सैनिक बांधवांना स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये प्रतिनिधित्व मिळावे यासाठी संघटनांनी ठोस मागणी केली आहे. ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद, नगरपालिका व महानगरपालिका अशा प्रत्येक ठिकाणी माजी सैनिकांसाठी किमान एक सदस्यत्व राखीव ठेवावे, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. याचबरोबर राज्यपाल नियुक्त आमदार, विधान परिषद, राज्यसभा व लोकसभेत माजी सैनिकांना प्रतिनिधित्व मिळावे, अशीही मागणी करण्यात आली. शिक्षक मतदारसंघाच्या धर्तीवर महाराष्ट्र राज्य सात विभागांमध्ये सात स्वतंत्र सैनिक मतदारसंघ निर्माण करून त्यातून सात माजी सैनिकांना आमदार करण्याचा प्रस्तावही संघटनांनी मांडला आहे. १९ ऑगस्ट रोजी राज्यभरातील विविध जिल्ह्यांत एकाचवेळी निवेदने देऊन हा प्रश्न उपस्थित करण्यात आला.

त्याचप्रमाणे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, राज्यपाल तसेच राज्य निवडणूक आयुक्तांना देखील निवेदन पाठविण्यात आले आहे.



जिल्ह्यातील त्रिदल सैनिक सेवा संघ, जय हिंद फाऊंडेशन व दि व्हॅलेनटस माजी सैनिक संघाच्या वतीने माजी सैनिक, शहीद परिवार व सैनिक परिवारांचे प्रश्न सोडविण्यासाठी राजकीय आरक्षणाची मागणी राज्य सरकारकडे करण्यात आली आहे. या संदर्भातील निवेदन निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब गिते यांना देण्यात आले.

# पर्युषण पर्वनिमित्त पहिल्या आणि शेवटच्या दिवशी नगर जिल्ह्यातील कत्तलखाने व मांस विक्री केंद्र बंद

नगर - दरवर्षी प्रमाणे जैन धर्मियांचे पर्युषण महापर्व २० ऑगस्ट पासून संपूर्ण देशात साजरे केले जाणार आहे. जैन समाजाच्या वतीने मिशन सेफ विहार ग्रुपचे अध्यक्ष इंजी. यश शहा यांनी महाराष्ट्र शासन आदेश तसेच निमल वेल्फेअर बोर्ड ऑफ इंडिया यांचे याबाबतचे परिपत्रक जोडून निवेदन ईमेल द्वारे पाठवून अहिल्यानगर जिल्हा प्रशासन यांना शासन आदेश प्रमाणे अहिल्यानगर जिल्ह्यातील पर्युषण महापर्व निमित्त दरवर्षी प्रमाणे प्रथम दिवशी २०, २१ ऑगस्ट रोजी आणि शेवटच्या दिवशी २७, २८ऑगस्ट रोजी जिल्ह्यातील सर्व कत्तलखाने आणि सर्व प्रकारचे मांस विक्री केंद्र अहिल्यानगर जिल्हात बंद ठेवण्यात यावे या बाबत मागणी केली होती. त्याला अनुसरून महाराष्ट्र शासन आदेश प्रमाणे दरवर्षी प्रमाणे अहिल्यानगर जिल्हा प्रशासनाने याबाबत बंद ठेवण्याबाबतचे आदेश पारित केले आहे. प्रशासनाने याबाबत जिल्हा पोलीस अधीक्षक, महापालिका आयुक्त, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, उपविभागीय दंडाधिकारी सर्व, जिल्हा प्रशासन अधिकारी नगरपालिका शाखा, तहसीलदार तथा कार्यकारी अधिकारी यांना परिपत्रकानुसार योग्य ती कार्यवाही आणि अंमलबजावणी करण्याबाबत चे आदेश जिल्हा प्रशासनाने दिले आहेत.


अहिल्यानगर महापालिका तसेच जिल्हा पोलिस प्रशासनाने देखील शासन आदेशानुसार योग्य ती कार्यवाही आणि अंमलबजावणी करण्याबाबत करण्याच्या सूचना संबंधित विभागास केल्या आहेत. तसेच महाराष्ट्र शासन आदेशाची संपूर्ण राज्यातील सर्व जिल्ह्यात अंमलबजावणी करण्यासाठी ईमेल मुख्यमंत्री कार्यालयास पाठवला आहे, तसेच कार्यालयाने पुढील कार्यवाही साठी संबंधित अधिकारी आणि विभागास पाठवला असल्याचे शहा यांनी सांगितले.



**भीमा नदीला आला पूर** भीमा नदीमध्ये मोठ्या प्रमाणावर पाण्याचा विसर्ग सोडण्यात आल्याने सिद्धटेक येथील पुलाला पाणी टेकले आहे. या परिसरात प्रशासनाने आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा सज्ज केली असून भीमा नदीकाठच्या लोकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

# लहुजी शक्ती सेनेचा २५ ऑगस्टला मुंबईमध्ये 'राज्यव्यापी मेळावा'

## जिल्ह्यातील सर्व आजी-माजी पदाधिकारी, कार्यकर्ते व समाज बांधवांनी सहभागी व्हावे : सुनिल शिंदे



नगर - महाराष्ट्र राज्यात मातंग समाजाच्या हक्कासाठी सातत्याने लढा देणारी सामाजिक व राजकीय चळवळ असलेल्या लहुजी शक्ती सेनेचा राज्यव्यापी मातंग समाज कार्यकर्ता संवाद मेळाव्याचे २५ ऑगस्ट रोजी मुंबई येथे आयोजन करण्यात आलेले आहे. या मेळाव्यात जिल्ह्यातील सर्व आजी-माजी पदाधिकारी, कार्यकर्ते व समाज बांधवांना सहभागी होण्याचे आवाहन प्रदेश सचिव सुनिल शिंदे यांनी केले आहे.

हा मेळावा सकाळी ११:३० वाजता यशवंतराव चव्हाण सेंटर, मुंबई येथे पार पडणार आहे. ऐतिहासिक मेळाव्याचे उद्घाटन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते होणार असून, या मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी संस्थापक अध्यक्ष विष्णूभाऊ कसबे व स्वागत अध्यक्ष म्हणून नारायणराव गायकवाड उपस्थित राहणार आहेत.

या मेळाव्यात उपमुख्यमंत्री शिंदे यांनी समाजाच्या हितासाठी घेतलेल्या ऐतिहासिक निर्णयाबद्दल त्यांचा गौरव करण्यात येणारा आहे. विशेषत: आर्टी स्थापना, साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे यांचे मुंबई वाटेगाव येथील स्मारक, पुणे-संगमवाडी येथील आद्य क्रांतीगुरु लहुजी वस्ताद साळवे स्मारक तसेच अनुसूचित जातीच्या आरक्षण वर्गीकरणासंबंधी शासन स्तरीय प्रयत्न यावर प्रकाश टाकला जाणार आहे.

समाजाचे प्रलंबित प्रश्न, शैक्षणिक, सामाजिक व राजकीय प्रश्न, भविष्यातील चळवळीची दिशा आणि संघटनात्मक पुनर्गठन व फेरबदल याविषयी विचार मंथन होणार आहे. या मेळाव्यातून आगामी जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपरिषद व महानगरपालिका निवडणुकांचे पार्श्वभूमीवर समाजाची भूमिका ठरविण्यात संबंधी मार्गदर्शन केले जाणार आहे.

हा मेळावा मातंग समाजाचे ऐतिहासिक संघर्षाला नवी दिशा देणारा ठरणार आहे. या मेळाव्यात राज्यभरातील सर्व विभागीय, जिल्हा व तालुका पदाधिकारी कार्यकर्ते तरुण वर्ग महिला आघाडीचे पदाधिकारी, समाजातील सर्व स्तरातील बांधव उपस्थित राहणार असल्याची माहिती प्रदेशाध्यक्ष कैलासराव खंदारे यांनी दिली आहे.

या मेळाव्यासाठी नगर जिल्ह्यातून पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी होण्यासाठी ज्ञानेश्वर जगधने, उत्तम रोकडे, सिताराम शिरसाठ, प्रवीण वैरागर, कृष्णा शेलार, लक्ष्मण निक्षेप, लखन मिसाळ, संतोष उमाप, किरण कनगरे, अनिल जाधव, लखन साळवे, जयवंत गायकवाड, सतीश शिंदे, संजय वाल्हेकर, प्रवीण शेंडगे, नवनाथ शिंदे आदी प्रयत्नशील आहेत.

# चहाची टपरी फोडून चोरी; गुन्हा दाखल

नगर - चहाच्या टपरीचा पत्रा उचकटून त्या टपरीत ठेवलेले चहाचे भांडे, खाद्य पदार्थाचे पाकीट, गायछाप तंबाखूचे पुडे, सिगारेटची पाकिटे असे १९ हजार ८२० रुपये किंमतीचे विविध साहित्य चोरट्यांनी चोरून नेल्याची घटना केडगाव औद्योगिक वसाहत परिसरातील पारस कंपनीच्या जवळ घडली आहे.

याबाबत रोहित हृदयनाथ सुपेकर (रा.भुषणनगर, केडगाव) यांनी कोतवाली पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी यांची पारस कंपनीच्या जवळ चहाची टपरी असून १८ ऑगस्ट रोजी रात्री त्यांनी टपरीला व्यवस्थित कुलूप लावले व ते घरी गेले. १९ ऑगस्ट रोजी सकाळी ते पुन्हा टपरी उघडण्यासाठी आले असता त्यांना टपरीचा एका बाजूचा पत्रा उचकटलेला दिसला. त्यांनी टपरी उघडून पाहिले असता आत मध्ये उचकापाचक झाल्याचे दिसून आले. तसेच टपरीतील चहाचे भांडे, खाद्य पदार्थाचे पाकीट, गायछाप तंबाखूचे पुडे, सिगारेटची पाकिटे असे १९ हजार ८२० रुपये किंमतीचे विविध साहित्य चोरट्यांनी चोरून नेल्याचे दिसून आले. त्यानंतर त्यांनी कोतवाली पोलिस ठाण्यात जावून फिर्याद दिली. या फिर्यादी वरून पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

## पांडुरंग बारस्कर यांचे अल्प आजाराने निधन



नगर - सावेडी येथील रहिवासी पांडुरंग मुक्ताजी बारस्कर (आप्पा) (वय ६५) यांचे २० ऑगस्ट रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे २ मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. अमित (पप्पू) व अशोक बारस्कर यांचे ते वडील होत.

## लक्ष्मीबाई कोठुळे यांचे वृद्धापकाळाने निधन



नगर - खडकी (ता.नगर) येथील रहिवासी लक्ष्मीबाई श्रीपतराव कोठुळे (वय ९२) यांचे २० ऑगस्ट रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्यावर खडकी अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे १ मुलगा, सुना, नातवंडे, पुतणे असा परिवार आहे. भानुदास कोठुळे यांच्या त्या मातोश्री होत.

## अलकाबाई बोरगे यांचे अल्प आजाराने निधन

नगर - बुरुडगाव (ता.नगर) येथील रहिवासी श्रीमती अलकाबाई सुनील बोरगे (वय ५०) यांचे ११ ऑगस्ट रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्यावर बुरुडगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.



त्यांच्या मागे २ मुली, १ मुलगा, सुन, जावई, नातवंडे असा परिवार आहे. सतीश बोरगे यांच्या त्या मातोश्री होत.

## अशोक एडके यांचे अल्पश: आजाराने निधन



श्रीरामपूर - गोपीनाथनगर, वॉर्ड नं.२ येथील अशोक दामोधर एडके (वय ६२) यांचे अल्पश: आजाराने दुःखद निधन झाले.

त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. शरद, शैलेश व राजेंद्र एडके यांचे वडील, दहावा ओट्याजवळील साई मंदिराचे पुजारी होत.

## सौ.अलका हरकल यांचे अल्प आजाराने निधन

श्रीरामपूर - सरस्वती कॉलनी, वॉर्ड नं.७ येथील रहिवाशी सौ.अलका सुभाष हरकल (वय ६२) यांचे अल्पश: आजाराने दुःखद निधन झाले.



त्यांच्या पश्चात पती, दोन मुले, दोन मुली, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. सुभाष हरकल यांच्या पत्नी, भाजपा युवा मोर्चाचे शहराध्यक्ष रुपेश हरकल व फळांचे व्यापारी प्रकाश हरकल यांच्या मातोश्री होत.

## द्रोपती तारडे यांचे वृद्धापकाळाने निधन

श्रीरामपूर - येथील द्रोपती एकनाथ तारडे (वय ८७) यांचे वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले.



त्यांच्या पश्चात दोन मुले, एक मुलगी, सुना, पुतणे, जावई, नातवंडे असा परिवार आहे. संगमनेररोड येथील श्री सिद्धिविनायक वेल्डिंग वर्क्सचे मालक विठ्ठल तारडे व विष्णू तारडे यांच्या मातोश्री, ज्येष्ठ पत्रकार मनोज आगे, ॲड. बाळासाहेब आगे व ॲड. कैलास आगे यांच्या आत्या, सुरेश शेवाळे यांच्या सासूबाई होत.

# राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत अधिकारी, कर्मचाऱ्यांचा दुसऱ्या दिवशीही बेमुदत संप सुरु

नगर - राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत जिल्हा रुग्णालयात सन २००५ पासून कंत्राटी पद्धतीने काम करत असलेल्या अधिकारी तसेच कर्मचारी यांनी विविध मागण्यांसाठी जिल्हा परिषद अहिल्यानगर समोर बेमुदत काम बंद आंदोलन सुरू आहे.

याबाबत निवेदनात म्हटले आहे की, राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत महाराष्ट्रातील कंत्राटी कर्मचाऱ्यांना नियमित शासन सेवेत समायोजनाबाबत होत असलेल्या विलंबासाठी शासन निर्णयनुसार दहा वर्षे व त्यापेक्षा जास्त सेवा झालेल्या कर्मचाऱ्यांना १४ मार्च २०२४ च्या शासन निर्णयानुसार शासन सेवेत समायोजन करणे बाबत शासन निर्णय निर्गमित झालेला आहे. जिल्हा शल्यचिकित्सक संजय घोगरे व जिल्हा परिषद जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.बापुसाहेब नागरगोजे यांनी आंदोलन स्थळी येऊन जाहीर पाठिंबा दिला.

यांप्रसंगी बोलताना डॉ. संजय घोगरे यांनी सांगितले की सर्व कंत्राट कर्मचारी यांची शासनाला गरज आहे, लवकरच त्यांचे समायोजन होईल.

तसेच डॉ.बापुसाहेब नागरगोजे यांनी सांगितले की, शासन दरबारी कंत्राटी कर्मचाऱ्यांना कायम सेवेत सामावून घेण्याचा लवकरच तोडगा निघत आहे. कर्मचाऱ्यांनी संयम बाळगावा. शिस्त बद्ध आंदोलन चालू ठेवावे.

यावेळी खासदार निलेश लंके यांनी मोबाईल संभाषणाद्वारे आंदोलकाना सकारात्मक मार्गदर्शन केले.

खासदार भाऊसाहेब वाकचौरे यांनी देखिल मोबाईल संभाषणाद्वारे आंदोलकाची विचारपुस केली व मागण्या अडचणी समजून घेतले. व केंद्र व राज्य स्तरावर आरोग्य यंत्रणेशी पाठपुरावा करण्याचे सहकार्य असेल असे सांगितले.

याचप्रमाणे राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष शरदचंद्र पवार महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष बाबासाहेब साळवे यांनी आंदोलनाला पाठिंबा जाहीर केला. या वेळी आंदोलन ठिकाणी पाठिंबा निवेदन स्वीकारताना जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. संजय घोगरे, जिल्हा परिषद जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बापुसाहेब नागरगोजे यांना निवेदन देताना जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक विजय गायकवाड, उदय देशपांडे, गोरख इंगुले आदी कर्मचारी.



राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत जिल्हा रुग्णालयात सन २००५ पासून कंत्राटी पद्धतीने काम करत असलेल्या अधिकारी तसेच कर्मचारी यांनी विविध मागण्यांसाठी जिल्हा परिषद अहिल्यानगर समोर बेमुदत काम बंद आंदोलन सुरू केले आहे.

# दरोडा टाकण्याच्या तयारीतील सात जणांची टोळी पकडली

## चाकू, लोखंडी पहार सह इतर साहित्य हस्तगत, नगर - पुणे रोडवर पोलिसांची कारवाई

नगर - मध्यरात्रीच्या सुमारास चाकू, लोखंडी पहार, छन्नी, हातोडा, लाकडी दांडक्यांसह दरोडा टाकण्याच्या तयारीत असलेली ७ जणांची टोळी नगर तालुका पोलिसांच्या पथकाने पकडली आहे. या टोळीकडून दरोडा टाकण्यासाठीचे साहित्यासह, मारुती सुझुकी कंपनीचा एक कॅरी टेम्पो, मोबाईल हस्तगत करण्यात आले आहेत. नगर पुणे महामार्गावर चास गावच्या शिवारात एका बंद पडलेल्या हॉटेल जवळ २० ऑगस्ट रोजी पहाटे १२.१५ च्या सुमारास ही कारवाई करण्यात आली आहे.

नगर पुणे महामार्गावर चास आणि काम रगावच्या शिवारात रात्रीच्या वेळी वाहनचालकांना लुटल्याच्या अनेक घटना घडल्या आहेत. या लुटारूंचा बंदोबस्त करण्यासाठी नगर तालुका पोलिसांनी या महामार्गावर रात्रीची गस्त वाढविलेली आहे. सहाय्यक पोलिस निरीक्षक प्रल्हाद गिते यांच्या सह पोलिस उपनिरीक्षक भरत धुमाळ, एकनाथ आव्हाड, पोलिस अंमलदार दत्तात्रय हिंगडे, बाबासाहेब खेडकर, नितीन शिंदे, विक्रांत भालसिंग, चालक विठ्ठल गोरे, साठे यांचे पथक या महामार्गावर रात्रीची गस्त घालत असताना १२.१५ वाजण्याच्या सुमारास चास शिवारातील बंद पडलेल्या हॉटेल श्रेया जवळ काही इसम संशयास्पद हालचाली करताना या पथकाला दिसून आले. पथकाने या सर्वांना शिताफीने पकडले.

त्यामध्ये सनी शामराव पवार (वय २३, रा. बुरूडगाव, ता.नगर), जय दिलीप बागुल (वय १९, रा. शेंडी, ता.नगर), अक्षय राजू देठे (वय २५, रा. शेंडी, ता.नगर), गणेश भीमराव पवार (वय १९, रा. बुरूडगाव, ता.नगर), पवन भाऊसाहेब ढमढेरे (वय २१, रा. बुरूडगाव, ता.नगर), राहुल संतोष गायकवाड (वय २२, रा. बुरूडगाव, ता.नगर), आकाश अनिल धोत्रे (वय १९, रा. बुरूडगाव, ता.नगर) यांचा समावेश आहे. त्यांच्या जवळील मारुती सुझुकी कंपनीच्या कॅरी टेम्पोची (क्र. एमएच १७ बी वय ७६५६) पाहणी केली असता त्यात चाकू, लोखंडी पहार, छन्नी, हातोडा, लाकडी दांडक्यांसह दरोडा टाकण्याचे साहित्य आढळून आले. पोलिसांनी त्यांच्या कडून सुमारे ३ लाख ८८ हजारांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

याबाबत स.फौ. दत्तात्रय हिंगडे यांनी दिलेल्या फिर्यादी वरून या ७ जणांच्या टोळी विरुद्ध बी एन एस कलम ३१० (४)(५) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक एकनाथ आव्हाड हे करीत आहेत. या टोळीने यापूर्वी काय काय गुन्हे केले आहेत, याची माहिती पोलिस घेत आहेत.

# शहर परिसरात दुचाक्या चोरणाऱ्या सराईत आरोपीला पकडले; चार दुचाक्या हस्तगत

नगर - नगर शहर परिसरात दुचाक्या चोरणाऱ्या सराईत आरोपीला स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने पकडले असून त्याच्या कडून चोरीच्या ४ दुचाक्या हस्तगत करण्यात आल्या आहेत. १९ ऑगस्ट रोजी राधाबाई काळे महिला महाविद्यालय परिसरामध्ये ही कारवाई करण्यात आली आहे.

पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी यांना जिल्ह्यातील वाहन चोरीचे घटनांमधील आरोपींची माहिती काढुन गुन्हे उघडकीस आणण्याचे आदेश दिले आहेत. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस अंमलदार गणेश धोत्रे, शाहिद शेख, राहुल द्वारके, फुरकान शेख, प्रकाश मांडगे, विशाल तनपुरे, सतिष भवर, प्रशांत राठोड, अरुण मोरे यांचे पथक तयार करुन सदर पथकास वाहन चोरीचे गुन्ह्यातील आरोपींची माहिती काढणेबाबत सुचना पो.नि. कबाडी यांनी दिल्या होत्या.

सदर पथकाने नगर शहरातील यापुर्वी वाहन चोरी झालेल्या घटना ठिकाणी भेटी देवुन अशाप्रकारे गुन्हे करणारे आरोपींची माहिती संकलित करण्यात आली. १९ ऑगस्ट रोजी पथकास गोपनीय माहिती मिळाली की, एक इसम चोरीची मोटारसायकल विक्री करण्याकरीता राधाबाई काळे महाविद्यालय परिसरामध्ये येणार आहे. ही माहिती मिळताच पथकाने त्या परिसरात सापळा लावला. थोड्या वेळात एक संशयीत इसम विनानंबरचे मोटारसायकलवर येतांना दिसला. सदर इसमास थांबवुन त्याचेकडील वाहनाबाबत चौकशी केली असता सदरची मोटारसायकल ही चोरीची असल्याचे निष्पन्न झाले.

सदर इसमास ताब्यात घेतले. त्याचे नाव सुनिल उर्फ बबलु दत्तात्रय आजबे (वय २९, रा. प्रेमदार हाडको, सावेडी, मुळ रा. देवटाकळी, ता. शेवगाव) असे असल्याचे त्याने सांगितले. ताब्यातील आरोपीस त्याने आणखी इतर काही मोटारसायकल चोरी केलेल्या आहेत काय याबाबत तपास करता त्याने त्याचा साथीदार हनुमंत उर्फ सचिन अंकुश झाडे (रा.सामनगाव, ता. शेवगाव) याचे मदतीने मोटारसायकली चोरी केल्याचे सांगितले असुन ताब्यातील आरोपीचे कब्जातुन १ लाख ४० हजार रुपये किमतीच्या खालील ४ मोटारसायकल हस्तगत करण्यात आल्या आहेत.



नगर शहर परिसरात दुचाक्या चोरणाऱ्या सराईत आरोपीला पकडून ४ दुचाक्या हस्तगत केल्यानंतर त्याचे समवेत स्थानिक गुन्हे शाखेचे पथक.

# गृहिणी

## आरोग्य

### प्या रुद्राक्षाचे पाणी

धार्मिक दृष्टिकोनातून रुद्राक्ष जितका महत्त्वाचा आहे तितकाच त्याचा वापर आरोग्यासाठीही तितकाच फायदेशीर आहे. रुद्राक्ष धारण करण्याव्यतिरिक्त, त्याचे पाणी पिणे फायदेशीर असल्याचे म्हटले जाते. जर तुम्ही नियमितपणे रुद्राक्षाचे पाणी प्यायले तर तुम्हाला तणाव आणि चिंता या समस्यांपासून आराम मिळतो. या विशेष प्रकारचे पाणी तुमच्या आतील अस्वस्थता आणि मानसिक ताण शांत करण्याचे काम करते. रुद्राक्षाचे पाणी प्यायल्याने चांगली झोप येते. जर तुमची झोप चांगली असेल तर इतर आरोग्य समस्या तुम्हाला त्रास देणार नाहीत. रुद्राक्षात असलेले ऊर्जा आणि सूक्ष्म घटक शरीराची रोगप्रतिकारक शक्ती वाढविण्यास मदत करतात. रुद्राक्षाचे पाणी पिणे हृदयाच्या आरोग्यासाठी फायदेशीर आहे. याशिवाय, ते हृदयाचे ठोके आणि रक्तदाब सुधारण्याचे काम करते. यासाठी सर्वप्रथम रात्रभर रुद्राक्ष पाण्यात भिजवा आणि सकाळी उठून ते पाणी गाळून रिकाम्या पोटी प्या. रुद्राक्ष खरे असावे. रुद्राक्ष शुद्ध असल्यास त्याचे औषधी गुणधर्म शरीराला फायदे देतात.

## पाककला

### चॉकलेट शंकरपाळे

**साहित्य** : २ वाट्या मैदा, मोहनासाठी आणि तळण्यासाठी तूप, पिठीसाखर, कणभर मीठ, पीठ, भिजविण्यासाठी दूध, अर्धा टी स्पून व्हॅनिला इसेन्स.

**कृती** : मैद्यामध्ये साखर, बेकिंग पावडर, मीठ, व्हॅनिला इसेन्स घालून नीट मिक्स करून घ्या. त्यात मूठ वळेपर्यंत तुपाचे मोहन घालून, तूप सगळ्या मिश्रणाला नीट चोळून घ्या. हा गोळा अर्धा तास झाकून ठेवा. कोको पावडरमध्ये दूध घालून घट्टसर गोळा मळा. भिजविलेले पीठ आणि कोकोचे गोळा अलगद मिक्स करा. पूर्ण एकजीव न करता कोकोच्या लाइन्स दिसतील, असं मिक्स करा. मोठी पोळी लाटून आवडीप्रमाणे शंकरपाळे लाटून तळा किंवा ओव्हनमध्ये १८० अंश तापमानावर २० मिनिटे बेक करा. या शंकरपाळ्यांवर वरून डेमोरश शुगर भुरभुरा (ब्राऊन शुगर).

## वास्तू

गहाण ठेवलेलं सोनं परत कसं आणता येईल याच संदर्भात महत्त्वाचा उपाय सांगण्यात आला आहे. या उपायाच्या माध्यमातून तुम्ही तुमचे दागिने घरात आणू शकता. एक काचेची वाटी घ्या. ही वाटी तुम्हाला घराच्या पश्चिम कोपऱ्यामध्ये किंवा पश्चिम दिशेला असणारे कपाट त्या ठिकाणी ठेवायची आहे. ही वाटी रिकामी ठेवायची आहे. त्यानंतर ज्या वेळेस तुम्ही दुकानात जाता तेव्हा ५-५ रुपयांची नाणी, जी पिवळ्या रंगाची असतात ती नाणी तुम्ही वाटीत जमा करायची आहेत. जसजशी तुम्ही ती नाणी जमा करत जाल त्यानंतर लवकरात लवकर तुमच्या घरात तुमचं गेलेलं सोनं परत मिळेल.

## सल्ला

कॉटनचे कपडे ज्यावेळी पहिल्यांदा धुतो त्यावेळी ते थोडेसे आकसतात. या स्थिती पासून वाचण्यासाठी आपण डिटर्जंट पावडर ऐवजी बेबी शाम्पू वापरू शकतो. यामुळे कपडे आखडणे पासून वाचतील. त्याचबरोबर त्याचा रंग सुद्धा जाणार नाही.

## सौंदर्य

अर्धा कप घट्ट दह्यात २ चमचे मध चांगले मिसळा आणि आपला चेहरा आणि मानेवर हा मास्क लावा. २० मिनिटांनी कोरडे होऊ द्या आणि धुवा. दही आणि मधाचे मिश्रण त्वचेला आतून पोषण देते.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

गुरुवार, दि. २१ ऑगस्ट २०२५

**शिवरात्रि, गुरुपुष्यामृत, शके १९४७ विश्वावसुनामसंवत्सर, श्रावण कृष्णपक्ष, पुष्य २४।०९, सूर्योदय ०६ वा. ३० मि. सूर्यास्त ०५ वा. ३० मि.**

## राशिभविष्य

**मेष** : आपणास आज संभाषणात काळजी घेण्याची गरज आहे. धावपळ जास्त होईल. देवाण-घेवाण टाळा. वेळ अनुकूल आहे.

**वृषभ** : स्वतःला इतर लोकांसमोर सादर करण्याचे सामर्थ्य अंगी येईल. इतर लोकांना तुमचे वचार पटतील. अधिकारी वर्गाचा पाठिंबा मिळेल. शत्रूंपासून सावध राहा.

**मिथुन** : आपण आपल्या महत्वाकांक्षा पूर्ण करू शकाल. राजकीय विषयांमध्ये स्थिती आनंददायी राहील. अधिकार क्षेत्र वाढेल. शत्रूंना भीती वाटेल.

**कर्क** : देवाण-घेवाण काळजीपूर्वक करा. अत्यंत व्यस्त राहाल. व्यापार व्यवसायात सावध राहाणे आवश्यक.

**सिंह** : मुलांवर खर्च होईल. कौटुंबिक प्रश्नांची उत्तरे मिळतील. वेळेचे भान पाळा. कामात अत्यंत व्यस्त राहाल. खर्च वाढेल. महत्त्वाच्या कामांमध्ये सावधगिरी बाळगा.

**कन्या** : स्त्री पक्षाकडे लक्ष ठेवा. अधिक श्रम करावे लागतील. आरोग्य मध्यम राहील. व्यापार-व्यवसायात सावधगिरी बाळगा.

**तूळ** : कौटुंबिक वाद-विवाद टाळा. आज घरगुती जबाबदाऱ्यांमध्ये आपली प्रगती आपणास संतुष्टी देईल.

**वृश्चिक** : इच्छित कार्यात यश मिळेल. कौटुंबिक जबाबदारी वाढेल. आरोग्य उत्तम राहील. शुभ वार्ता मिळतील.

**धनु** : एखाद्या महत्वाच्या प्रोजेक्टमध्ये यश मिळेल. मनोरंजनावर खर्च होण्याची शक्यता आहे. प्रेमात स्थिती अनुकूल राहील. आपल्या प्रकृतीची काळजी घ्या.


**मकर** : हसत खेळत दिवस जाईल. आर्थिक स्थिती संमिश्र राहील. कुटुंबातही वेळ चांगला जाईल. वरिष्ठ लोकांचे कामात सहकार्य मिळेल.

**कुंभ** : देवाण-घेवाणीबाबत काळजीपूर्वक व्यवहार करा. अत्यंत व्यस्त राहाल. व्यापार व्यवसायात सावध राहाणे आवश्यक. वाहने काळजीपूर्वक चालवा.

**मीन** : जोखमीच्या कार्यात पैसा गुंतवू नका. महत्वपूर्ण कामे यशस्वीरित्या पूर्ण होतील. आरोग्य उत्तम राहील. पत्र मिळेल.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# शब्दगंध क्र. ७२४६ सौ.शैलजा कुलकर्णी



**आडवे शब्द** : १) भास्कर; रवि; सूर्य ४) हार; पराजय; असफलता; अपयश ६) तप्त; तापलेले; लसलशीत ८) माला; हार; तुलना; बरोबरी ९) तरळ; क्षणिक; पातळ १०) पांघरण्याचे एक उंची वस्त्र; शाल ११) बाण सोडल्यानंतर येणारा धनुष्याच्या दोरीचा आवाज १२) भारतातील एक नदी १४) गोष्ट; कलम १५) वर्तमान दिवस; चालू दिवस १७) सकट; बरोबर; सारखे १८) देश सोडून पळून गेलेला १९) दिवस; दिन; दीस

**उभे शब्द** :- १) एकंदरीत; निवड न करता २) स्मरण नसणे ३) धातूचा दोरा; वायर ४) सचोटीविषयीचा दुसऱ्याचा विश्वास; प्रतिष्ठा; वजन ५) झाडाच्या सालीचे वस्त्र ७) शशी; चंद्र ९) एक भाजी १०) आदर; सन्मान; गौरव १३) श्रीकृष्ण; रत्नजडित मंदिर १४) उद्यान; बगीचा; उपवन १५) पंचमहाभूतांपैकी एक; पाणी १६) थोडेसे; म्हातारपण १७) नेहमी; उपवन

### शब्दगंध क्र. ७२४५ चे उत्तर



# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

: संकलक : ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार** : मनुष्य स्वतःच स्वतःच्या नशिबाचा शिल्पकार आहे.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### जेनेटीक मॅपिंग म्हणजे काय?

माणसाच्या प्रत्येक पेशीत ४६ रंगसूत्रे असतात. ही रंगसूत्रे २३ जोड्यांच्या स्वरूपात असतात. यापैकी २२ जोड्या शरीरसूत्रांच्या, तर १ जोडी लिंगसूत्राची असते. व्यक्तीची शारीरिक ठेवण, डोळ्यांच्या रंग, केसांचा रंग, केसांचा प्रकार, त्वचेचा रंग, उंची, लिंग या सर्व बाबी रंगसूत्रांवर अवलंबून असतात. रंगसूत्रामध्ये वा जनुका असतात. या जनुकांवर एकेक गुणधर्म अवलंबून असतो.

काही आजार जनुकात झालेल्या बिघाडामुळे निर्माण होतात असे शास्त्रीय अभ्यासातून सिद्ध झाले आहे. या जनुका जर बदलता आल्या, तर ते आजार टाळता येतील. त्यासाठी माणसात आढळून येणाऱ्या सर्व रंगसूत्रांचा, जनुकांचा शोध घेऊन त्यांची रचना लक्षात येणे आवश्यक होते. अमेरिका, इंग्लंड, फ्रान्स या देशांनी म्हणूनच युनेस्कोबरोबर एकत्रितपणे ह्यूमन जिनोम प्रोजेक्ट सुरू केला होता. याची परिणती मानवी जनुकीय संरचना पूर्णपणे ज्ञात होण्यात झाली आहे.

जनुकांची रचना माहीत करण्याची पद्धत म्हणजे जेनेटीक मॅपिंग होय. जेनेटीक मॅपिंग करण्यासाठी संबंधित व्यक्तीचे रक्त वा उतीद्रव्य घेण्यात येतात. प्रयोगशाळेत विविध प्रक्रिया करून शास्त्रज्ञ त्यातून डीएनए हा रंगसूत्रांतील मूलभूत घटक वेगळा करतात. या डीएनएवरील न्युक्लिओसाईड्सच्या विविध संरचनांचा अभ्यास करून कोणता रोग होण्याची शक्यता आहे याचे विश्लेषण केले जाते. भविष्यात अशा रोगग्रस्त जनुकांची दुरुस्ती किंवा त्यात बदल घडवून आणण्यात येऊ शकतील आणि जगातील अनेक रोग टाळता येतील किंवा बरे करता येतील अशी आशा निर्माण झाली आहे.

### द्रौपदी व पाच पांडव

ब्रह्मदेवांनी जी अठरा महापुराणे निर्माण केली त्यांची नावे अशी ब्रह्म, पद्म, विष्णू, शिव, भागवत, नारद, मार्कंडेय, अग्नी, भविष्य, ब्रह्मवैवर्त, नृसिंह, वराह, स्कंद, वामन, कूर्म, मत्स्य, गरुड व ब्रह्मांड. मार्कंडेय पुराण हे त्यापैकी एक महत्त्वाचे पुराण मानले गेले आहे. व्यासशिष्य जैमिनी यांनी मार्कंडेय यांना महाभारतासंबंधी काही शंका विचारल्या. त्यात, द्रौपदी ही पाच पांडवांची पत्नी कशी झाली?' अशी एक शंका होती. याचे उत्तर विंध्य पर्वतावर पक्षियोनीत असलेल्या चार धर्मात्म्यांनी दिले ते असे-

पूर्वी त्वष्टा प्रजापतीचा मुलगा इंद्राच्या हातून मारला गेला. त्या ब्रह्महत्येने इंद्राचे तेज कमी झाले व ते धर्मराजाच्या शरीरात आले. पुत्राच्या मृत्यूने संतप्त झालेल्या त्वष्ट्याने होमकुंडातून वृत्र नावाचा असुर इंद्राला मारण्यासाठी निर्माण केला. त्याच्या अक्राळविक्राळ स्वरुपास घाबरुन तह करण्यासाठी सप्तर्षींना पाठवले. त्यांनी चतुराईने वागून इंद्र व वृत्र यांची मैत्री घडवून आणली. पण पुढे इंद्राने विश्वासघाताने वृत्रासुरास मारले. त्यामुळे पुन्हा त्याचे तेज कमी होऊन ते वायूच्या शरीरात सामावले गेले. नंतर इंद्राने गौतमाचे रूप घेऊन अहिल्येस फसवले. तेव्हा त्याचे रूपसौंदर्य त्याला सोडून अश्विनीकुमारांकडे गेले. अशा प्रकारे इंद्र हा धर्म, तेज, बल, लावण्य यांना वंचित झाला.

इंद्रास जिंकण्यासाठी महाबली दैत्य निर्माण झाले. त्यांनी पृथ्वीवर बरेच अत्याचार केले. आपल्या शांतीसाठी पृथ्वीने देवांना साकडे घातले. तेव्हा सर्व देव आपापल्या अंशाने पृथ्वीवर अवतीर्ण झाले. स्वतः धर्मराज कुंतीच्या पोटी युधिष्ठिर म्हणून जन्माला आले. वायुदेवाने भीमाचा जन्म घेतला. अर्जुन हा इंद्राचाच पुत्र असून तो त्याचा अर्धा अंश घेऊन जन्माला आला. अश्विनीकुमार माद्रीच्या पोटी नकुल व सहदेव जन्मले.

अशाप्रकारे इंद्र पाच रूपांत अवतीर्ण झाला. इंद्राची पत्नी शची ही द्रौपदीच्या रुपाने अग्नीतून प्रकट झाली. इंद्राने पाच शरीरे धारण केली असल्याने ती एकटी पाच पांडवांची पत्नी झाली. अशा प्रकारे जैमिनींचे समाधान पक्ष्यांनी केले. त्यांच्या आणखीही काही शंकांची त्यांनी उत्तरे दिली.

या पक्ष्यांची नावे पिंगाक्ष, विबोध, सुपुत्र व सुमुख अशी असून, दुर्वासांच्या शापामुळे पक्षीण झालेल्या वपू नावाच्या अप्सरेची ती मुले होती. या चौघांना शमीक नावाच्या ऋषींनी सांभाळले. त्यांच्यावर विद्येचे संस्कार करून त्यांना ज्ञानी केले.

# जीवन का अमृत (भाग १)



हे प्रभु ! मैं अनाथ हूँ। आप ही मेरे माई-बाप हैं, आप मेरी सम्भाल कीजिए । अपने आप में मुझे लीन कर लीजिए । अपने आपसे एकमेक कर लीजिए । आगे गुरु अर्जनदेव जी फरमा रहे हैं :

**खोजत खोजत भई बैरागनि**
**प्रभू, दरसन कउ हउ फिरत तिसाई ।।**

प्रभु को खोजते-खोजते मैं भटक गई हूँ । कभी मैंने तुझे इस दरवाजे पर ढूँढा, कभी कहीं और देखा, जहाँ भी मैं गई, मैंने ठोकरें खायीं, क्योंकि मैं अपराविद्या के साधनों को करती चली गई । यहाँ आत्मा प्रभु से अपनी हालत बयान कर रही है कि जहाँ भी मैं गई, मेरी दुर्गति हुई । जब इंसान इस दुनिया में भटकता रहता है, तो कभी वह एक रास्ता अख्तियार करता है, कभी दूसरा, कभी तीसरा, उसे

### गुरू और परमात्मा

कहीं भी तसल्ली नहीं होती, कोई सही रास्ता दिखाई नहीं देता । काल ने माया का इतना गहरा जाल बिछाया हुआ है कि सारी दुनिया भूल में जा रही है । इसी जाल में आत्मा कैद है । एक योनि से दूसरी, दूसरी से तीसरी, इसी प्रकार भटकने के बाद उसे मानव चोला मिला है । मानव चोला मिलने के बाद भी उसका भटकना नहीं रुका । इतना भटकने के बाद उसे यह समझ आया कि जब तक वह प्रभु से प्रार्थना नहीं करेगी, उसे रास्ता नहीं मिलेगा । विरह की पीड़ा सहने के कारण उसमें प्रभु के लिए सच्चा प्यार उत्पन्न हो गया । जिस चीज़ को पाना हो, उससे हमें प्यार हो जाता है । अगर हमने प्रभु को पाना है, तो अपने दिल में प्रेम की भावना जाग्रत करनी होगी । प्रभु से प्रेम ही सच्चा प्रेम है । परम संत कृपालसिंह जी महाराज फ़रमाया करते थे कि सच्चा प्रेमी ही सच्चा वैरागी है, सच्चा एकांती है और शुद्ध हृदय वाला है । जो प्रभु से प्रेम करेगा, उसे दुनिया से मोह नहीं होगा । वही अंदर से पवित्र है, उसका हृदय साफ़ है । जब तक हमारा हृदय साफ़ नहीं होगा, तब तक हम प्रभु से प्रेम नहीं कर सकते । संत कृपालसिंह जी महाराज यह भी फरमाया करते थे, वही सच्चा एकांती है जो एकांत में बैठकर सिर्फ प्रभु को याद करता है, अपने ध्यान को दुनिया से हटाकर शिवनेत्र पर एकाग्र करता है । यही गुरू अर्जनदेव जी फरमा रहे हैं कि प्रभु के दर्शन करने के लिए मैं तरस गया हूँ, मुझे प्रभु दर्शन की प्यास है । हर तरफ की ठोकरें खाने के बाद भी मुझे तेरे दर्शन की चाह है । गुरू अर्जनदेव जी आत्मा की विकास की अवस्था का जिक्र कर रहे हैं । आखिर में गुरू अर्जनदेव जी महाराज फरमा रहे हैं ।

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

# अंतरिक बल (भाग - २)

यह योग कोई भी व्यक्ती कर सकता है चाहे वह किसी भी जाति, धर्म, रंग, उम्र, व्यवसाय, देश आदि का हो क्योंकि राजयोग इन सब बन्धनों से पार ले जाता है । ऐसी अनुभूति व्यक्ति खुद भी कर सकता है तो किसी और व्यक्ति, वस्तु या वनस्पति को भी करा सकता है । सिर्फ आवश्यकता है स्नेह और प्रेम से उस व्यक्ति, वस्तु या वनस्पति के साथ रिश्ता जोड़ने की ।

वनस्पति जगत के कुछ वैज्ञानिक सिद्धांत डॉ. सर जगदीश चंद्र बोसने अपने प्रयोग द्वारा सिद्ध किया कि मनुष्यों की तरह ही वृक्ष वनस्पतियों की क्रियायें होती हैं । वनस्पतियाँ फेफड़े बिना सास ले सकती हैं, बिना पेट के अन्न को हजम कर सकती हैं, स्नायु बिना हलचल भी कर सकती हैं । तो किसी ज्ञान संस्था के बिना सन्देश ग्रहण करना और उसे प्रतिक्रिया देना, यह क्रिया भी वनस्पतियाँ करती हैं । उन्होंने वनस्पति के अन्दर की हलचल को जानने की एक मशीन तैयार की, जिसके आधार से सिद्ध

### आज्ञा चक्र

किया कि मृत्यु के अन्तिम क्षण में जैसे प्राणी, पशु हबकते है वैसे ही वनस्पति भी अन्तिम क्षण के समय हबकते हैं । उसी समय उनके भीतर से बड़े पैमाने पर उर्जा बाहर फेंकी जाती है । उन्होंने ऑप्टिकल पल्स रेकॉर्डर मशीन द्वारा यह स्पष्ट किया कि जब वनस्पति को बाहर से कोई ऊर्जा (वायब्रेशन) स्पर्श करती है तो उस ऊर्जा का वनस्पतियों में विद्युत शक्ति में परिवर्तन होता है और उसका प्रत्यक्ष परिणाम दिखाई देता है । क्लीव बॅकस्टर जी ने जगदीशचंद्र बोस जी के इस संशोधन को आगे बढ़ाते हुए यह सिद्ध कर बताया कि वनस्पतियों में भावनायें भी होती है, उन्होंने मनुष्य के मन की भावनायें समझ में आती हैं । उन्होंने लाय डिटेक्टर नाम की मशीन द्वारा वनस्पतियों पर कुछ प्रयोग किये । मन के अन्दर की भावनाओं के कारण वनस्पति के अन्दर की ऊर्जा का प्रवाह कम ज्यादा होता है । उस प्रवाह को भावनाओं के द्वारा होने वाला प्रतिशोध लाय डिटेक्टर में गॅलव्हानो मीटर से नापा जाता है।

मनुष्य के मन की भावनाओं को वनस्पतियाँ कैसे प्रतिक्रियायें देती हैं यह देखने के लिए उन्होंने डॅसिना नामक वनस्पति का पत्ता यंत्र को जोड़ दिया और मन में सोचा कि अभी यह पत्ता जलायें । तो आश्चर्य की बात है ! पत्ता जलाने का विचार मन में आते ही माचिस हाथ में लेने के पहले ही तुरंत यंत्र पर आलेख दर्शानेवाली सुई जोर-जोर से प्रतिरोध दर्शाने लगी । उसी समय उन्होंने समझ लिया कि उसके मन के विचारों को वनस्पति ने समझ लिया है । दूसरी बार उन्होंने इच्छा के विरुद्ध पत्ता जलाने का नाटक किया तो उस समय पेड़ द्वारा की गई प्रतिक्रिया कम गति वाली थी तो इससे सिद्ध होता है कि पेड़ सच और झूठ के विचार भी समझ जाते हैं ।

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

वडील : नापास झालास तर यापुढे मला 'बाबा' म्हणून हाक मारू नकोस

सालाबादाप्रमाणे याही वर्षी आपला चंद्या नापास झाला,

वडील : काय लागला निकाल?

चंद्या : माफ कर रे रम्या, तुला बाबा म्हणून हाक मारण माझ्या नशिबात नाहीये बहुतेक...

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

✻ मुंबई उच्च न्यायालयाचे कितवे सरन्यायाधीश म्हणून अशोक अराधे यांनी शपथ घेतली? - ४८ वे

**- अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# काय खावे?

**विहार** : पाऊस संततधार सुरू असल्यामुळे घराबाहेर पडताना छत्री किंवा रेनकोट घेऊन बाहेर पडावे. यदाकदाचित पावसात भिजल्यास लगेच ओले कपडे बदलून इस्त्री केलेले थोडेसे गरम, जाड सुती व स्वच्छ कपडे घालावे. या ऋतूमध्ये पावसाळी दमट हवेमुळे कपड्यांना कुबट वास येतो. म्हणून उन्हामध्ये कपडे वाळवून कपाटामध्ये व्यवस्थित ठेवावे. या ऋतूमध्ये जाडसर सुती साड्या, ड्रेस, शर्ट्स, पॅन्ट्स वापरावेत. कपड्यांचा रंग गडद वापरावा. म्हणजे पावसाच्या डागाने कपडे खराब होणार नाहीत. याकरिता काळे, राखाडी, हिरवे, चॉकलेटी अशा रंगांचे कपडे वापरावेत. शरीराला ऊब मिळण्यासाठी लोकरीचे स्वेटर, शाल यांचा वापर करावा. चपलांची निवड करताना काळजी घ्यावी. चपलांमुळे पावसात घसरून पडण्याची भीती असते, म्हणून स्लिपर,

### आयुर्वेदीय आहार दृष्टीकोन

कातडी चपला, उंच टाचाच्या चपला वापरू नयेत. त्याऐवजी पायाला घट्ट पकड असणारे शूज-सँडलचा वापर करावा. पावसाळी ढगाळ वातावरणामुळे मन आनंदी राहत नाही. कोणतेही काम करावेसे वाटत नाही. अशा वेळी शास्त्रीय संगीत, बासरीवादन, तानपुरा यांचे संगीत घरामध्ये लावावे. त्यामुळे मन आनंदी राहते. या ऋतूत दुपारची झोप घेऊ नये, असे सांगितले आहे. तसेच जागरण करू नये. त्यामुळे वातप्रकोप अजूनच वाढतो. या ऋतूत अशक्तपणा जाणवत असल्याने अति व्यायाम करू नये. जिमच्या व्यायामापेक्षा नियमितपणे सूर्यनमस्कार, योगासने, प्राणायाम करावा.

**आयुर्वेदिक उपचार** : वर्षा ऋतूत सतत पडणाऱ्या पावसामुळे सर्दी-खोकला, ताप असे आजार उद्‌भवतात. हे आजार झाल्यास त्रिभुवनकीर्ती, नागगुटी, तालिसादी चूर्ण, वासावलेह ही औषधे वापरावीत. या ऋतूमध्ये पचनशक्ती कमी झाल्यामुळे पचन व्यवस्थित होत नाही. याकरिता त्रिकटू चूर्ण, हिंग्वाष्टक चूर्ण यांचा वापर करावा. तसेच अशक्तपणा कमी होण्यासाठी व रोगप्रतिकारक शक्ती वाढण्यासाठी च्यवनप्राश व सखीप्राश ही औषधे घ्यावीत. पंचकर्म चिकित्से मध्ये बस्ती चिकित्सा श्रेष्ठ असते. कारण या ऋतू मध्ये वातप्रकोप होत असतो व बस्ती उपचारामुळे वातप्रकोप नाहीसा होतो. **(क्रमशः)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००

# सकस साहित्य निर्माण झाले तर साहित्यिकांप्रती समाजही संवेदनशीलता ठेवतो

## फकिरा पवार यांचे प्रतिपादन

आळंदी – आदर्शवत साहित्य निर्माण करण्यासाठी साहित्यिकांनी प्रयत्न केले पाहिजेत, समाजाला आनंद देणारे सकस साहित्य निर्माण झाले तर साहित्यिकांप्रती समाजही मोठी संवेदनशीलता बाळगतो. आठवडसारख्या छोट्या गावातून शहराकडे येऊन सुरुवातीच्या काळात त्यांनी पत्रकारितेच्या माध्यमातून राजेंद्र चोभे यांनी सामाजिक उत्तरदायित्व दाखवून दिले आहे, त्यांच्या कार्यकर्तुत्वाची दखल राज्यस्तरीय साहित्य संवाद घेण्यात आली, असे प्रतिपादन उद्योजक फकीरा पवार यांनी व्यक्त केले.

शब्दगंध साहित्यिक परिषदेच्यावतीने आळंदी येथे आयोजित दुसरे राज्यस्तरीय मध्यवर्ती साहित्य संवाद कार्यक्रम व काव्य संमेलनाच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. राजेंद्र चोभे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमाच्यावेळी व व्यासपीठावरून पुणे विद्यापीठाच्या मराठी अभ्यास मंडळाचे अध्यक्ष प्रा. डॉ. संदीप सांगळे, डॉ. कमलकांत वडेलकर, किसनराव घुले, शब्दगंधचे संस्थापक सचिव सुनील गोसावी, अध्यक्ष राजेंद्र उदागे उपस्थित होते.

पुढे बोलताना फकीरा पवार म्हणाले की, आपण खूप खडतर आयुष्य सोसून उभे राहिलो, आपल्याला घडवण्यासाठी आपल्या आईने खूप काबाडकष्ट केले. आयुष्यात यशस्वी होण्यासाठी जिद्द चिकाटी संयम ठेवून सतत कार्यरत योग्य नियोजन करा व मोठी स्वप्ने पहा, एक आदर्शवत सुदृढ समाज निर्माण करण्यासाठी प्रयत्न करा. शब्दगंध सोबत आपण जोडले गेलो आहोत, ही चळवळ अधिक गतिमान होण्यासाठी आपण सर्वतोपरी सहकार्य करू असे आश्वासन त्यांनी दिले.


शब्दगंध साहित्यिक परिषदेच्यावतीने आळंदी येथे आयोजित दुसरे राज्यस्तरीय मध्यवर्ती साहित्य संवाद कार्यक्रम व काव्य संमेलनाच्या उद्घाटन प्रसंगी फकिरा पवार आदी.

यावेळी बोलताना ह. भ. प. गोरक्षनाथ महाराज उदागे म्हणाले की, समाजाला भौतिक आणि मानसिकदृष्ट्या सुधारण्याचे काम सर्वच संतांनी केले असून बंधुता, प्रेमभाव प्रस्थापित करून ऐक्याची शिकवण दिली यावरूनच संत साहित्याची समाजाप्रती उपयोगिता लक्षात येते.

डॉ. कमलकांत वडेलकर बोलताना म्हणाले की, शब्दगंधची चळवळ आपण खूप जवळून पाहिली असून सुरुवातीच्या काळापासून आपण त्यांच्यासोबत आहोत, शब्दगंधने आज आधुनिकतेचा विचार मांडला आहे, तो खर्‍या अर्थाने नव महाराष्ट्राला गती देणार आहे.

अध्यक्षपदावरून बोलताना राजेंद्र चोभे पाटील म्हणाले की, श्री क्षेत्र नेवासा ते आळंदी हा अमृतानुभव मराठी भाषेला अधिक समृद्ध करणारा आहे, शब्दगंध करीत असलेले कार्य महाराष्ट्रभर पोचवण्यासाठी आळंदी हे ठिकाण निवडले आणि या माध्यमातून ही चळवळ मोठी करण्याचा प्रयत्न सुरू केला आहे.

अध्यक्ष राजेंद्र उदागे यांनी शब्दगंध साहित्य संवाद कार्यक्रमाची संकल्पना मांडली व ती शब्दगंधच्या कार्यकारी मंडळांनी यशस्वी करून दाखवली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक संस्थापक सचिव सुनील गोसावी यांनी केले. प्रा. डॉ. अशोक कानडे यांनी आभार मानले. सूत्रसंचालन शर्मिला गोसावी यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्राचार्य डॉ. जी. पी. ढाकणे, प्रा. डॉ.तुकाराम गोंदकर, प्रा. डॉ. अनिल गर्जे, बबनराव गिरी, राजेंद्र फंड, भगवान राऊत, मकरंद घोडके, प्रशांत सूर्यवंशी, राजेंद्र पवार, निखिल गिरी, भाग्यश्री राऊत, दिशा गोसावी, हर्षली गिरी, ऋषिकेश राऊत, स्नेहल रूपटक्के आदींनी प्रयत्न केले. श्री संत ज्ञानेश्वर महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून कार्यक्रमाचे उद्घाटन झाले. शाहीर भारत गाडेकर, वसंत डंबाळे, दिगंबर गोंधळी, शिवाजी थिटे, प्रशांत सूर्यवंशी यांनी प्रबोधनपर सांस्कृतिक कार्यक्रम सादर केला.डॉ. श्रुतिका कानडे यांनी कथक नृत्यद्वारे गणेश वंदना सादर केली. राज्यस्तरीय शब्दगंध पुरस्कार उद्योजक नानासाहेब शेळके (पुणे), लेखक मारुती खडके (चिचोंडी), कवी विठ्ठल बरसमवाड (नांदेड), शिरीष थोरवे (आष्टी) यांना प्रदान करण्यात आले. त्यानंतर बाळासाहेब देशमुख यांचे कथाकथन झाले.

## अहिल्यानगर शहरात प्रथमच २१ ऑगस्ट रोजी एक शाम गोमाता के नाम विशाल भजन संध्या

नगर – एमआयडीसी येथील रेणुकामाता मंदिर कार्यालय येथे सकल राजस्थानी समाजाच्या वतीने अहिल्यानगर येथे प्रथमच एक शाम गोमाता के नाम विशाल भजन संध्या चे आयोजन २१ ऑगस्ट रोजी गुरुवारी सायंकाळी ६ वाजता आयोजन करण्यात आले आहे.


उदयसिंह राजपुरोहित रमेशसिंह राजपुरोहित

या विशाल भजन संध्या कार्यक्रमात गायक उदय सिंह राजपुरोहित व रमेश सिंह राजपुरोहित भक्ती संगीतचे गायन करण्यात येणार आहेत. या कार्यक्रमासाठी गौसेवा आयोगाचे अध्यक्ष व राज्यमंत्री शेखर मुंदडा, आमदार संग्राम जगताप, पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, राजस्थानचे लोक देवता बाबा रामदेवजी महाराज यांचे १९ वे वंशज महेंद्र सिंह तंवर आदींसह हिंदुत्ववादी नेते प्रमुख उपस्थितीत राहणार आहेत. या कार्यक्रमासाठी अहिल्यानगर येथील गोरक्षक, हिंदू भक्त, गोसेवक व हिंदुत्व वादी संघटना व हिंदू भक्तांनी उपस्थित राहावे. असे आवाहन गौरक्षा फाउंडेशनचे अध्यक्ष तथा मानद पशु कल्याण अधिकारी मयूर सिंह राजपुरोहित यांनी केले आहे.

## संघर्ष फाउंडेशनतर्फे २१ ऑगस्ट रोजी रक्तदान शिबिर व सामाजिक उपक्रम

नगर – संघर्ष फाउंडेशनतर्फे २१ ऑगस्ट रोजी कान्हुर पठार येथे सकाळी ९ ते सायंकाळी ५ या वेळेत रक्तदान शिबिर तसेच विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यात रक्तदान शिबिराबरोबरच वृक्षारोपण, रुग्णांना फळांचे वाटप तसेच शालेय विद्यार्थ्यांसाठी निबंध स्पर्धा यांचा समावेश असून, प्रत्येक वयोगटातील नागरिकांनी सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे. या शिबिरात सहभागी होऊन रक्तदान करण्याचे आवाहन प्रवीणभाऊ दळवी मित्र परिवाराने केले आहे.


शेंडी पोखर्डी परिसरातील ग्रामस्थांच्या मदतीने विद्यालयामध्ये उभारण्यात आलेल्या नवीन संगणक लॅबच्या उद्घाटन प्रसंगी जी. डी. खानदेशे, मुकेश मुळे व अहिल्यानगर जिल्हा परिषद सहाय्यक वित्त अधिकारी रमेशराव कासार आदी.

## न्यू इंग्लिश स्कूलमध्ये आयसीटी लॅबचे उद्घाटन

नगर – शेंडी पोखर्डी व परिसरातील ग्राम स्थांच्या मदतीने विद्यालयातील विद्यार्थ्यांना संगणकाचे ज्ञान मिळण्यासाठी नवीन संगणक लॅबची उभारणी करण्यात आली. त्याचे उद्घाटन अ. नगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे विश्वस्त जी. डी. खानदेशे, मुकेश मुळे व अहिल्यानगर जिल्हा परिषद सहाय्यक वित्त अधिकारी रमेशराव कासार यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी जीडी खानदेशी यांनी एकविसाव्या शतकातील संगणकीय युग आहे. आता इथून पुढे प्रत्येक गोष्टीमध्ये संगणकाचा वापर अत्यावश्यक झालेला आहे. या स्पर्धेच्या युगात प्रत्येक विध्यार्थ्यानी विशेषतः ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी शालेय जीवनापासूनच संगणकाचे ज्ञान आत्मसात करणे गरजेचे आणि आवश्यक बनले आहे. विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा असे सांगितले.

मुकेश मुळे यांनी आय सी. टी लॅब उभारणीसाठी शेंडी, पोखर्डी, पिंपळगाव उज्जैनी परिसरातील ग्रामस्थ व विद्यालयातील मुख्याध्यापक मुळे बी. बी. व पर्यवेक्षक भिसे बी. वाय व सर्व सेवक वृंद यांचे कौतुक केले.

विद्यालयात संगणक शिकवण्यासाठी तज्ज्ञ शिक्षकांची नेमणूक करून त्याचा फायदा विद्यार्थ्यांना कसा होईल याकडे लक्ष देण्याचे सुचविले व या स्पर्धेच्या युगात ग्रामीण भागातील विद्यार्थी संगणक साक्षर होऊन स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी याचा विद्यार्थ्यांनी फायदा करून घ्यावा असे आवाहन केले.

रमेशराव कासार यांनी आजचे शिक्षण व भविष्यातील नोकरी व व्यवसायातील संधी यासाठी संगणक शिक्षण किती महत्वाचे आहे. त्यासाठी सर्व विद्यार्थ्यांनी संगणक साक्षर असणे आवश्यक आहे. हे युगच संगणक युग आहे. प्रत्येक क्षेत्रात संगणकाचा वापर गरजेचा आहे व ती काळाची गरज आहे. असे सांगून पुढील काळात विद्यालयात भरीव मदतीचे आश्वासन दिले.

तसेच संस्थेचे अध्यक्ष शिक्षण महर्षी स्व. माधवराव मुळे तथा आबा यांच्या ९३ व्या जयंती निमित्त विद्यालयातील २५ विद्यार्थ्यांना मुळे बी. बी. व सतीश इंगळे पायमोडे यांचे तर्फे गणवेश वाटप करण्यात आले. विद्यालयाचे मुख्याध्यापक मुळे बाबासाहेब यांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन श्रीमती मंजुषा माने, सुहास एकलहरे व मनीष म्हस्के यांनी केले. पर्यवेक्षक भिसे बाळासाहेब यांनी आभार मानले.

## बालरंगभूमी परिषद व कलारंगतर्फे अहिल्यानगरमध्ये २४ ऑगस्ट रोजी श्री गणेशमूर्ती मातीकाम कार्यशाळा

नगर – बालरंगभूमी परिषद यंदा गणेशोत्सवानिमित्त एक विशेष उपक्रम घेऊन आली आहे. गणपती मातीकाम कार्यशाळा मुलांच्या कल्पनाशक्तीला आणि पर्यावरण प्रेमाला नवा आयाम देणारा ठरणार आहे.

गणेशोत्सव हा महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनाचा अविभाज्य भाग असून अलीकडेच त्याला राज्य महोत्सव म्हणून घोषित करण्यात आले आहे. पर्यावरणपूरकतेचा संदेश देणाऱ्या गणेशोत्सवाची तयारी आता अधिक अर्थपूर्ण आणि सर्जनशील बनवण्याचा प्रयत्न अहिल्यानगर शाखा व कलारंग संयुक्तरित्या करत आहे. या उपक्रमात सहभागी होणाऱ्यांना शाडू मातीपासून आपला गणपती स्वतः तयार करण्याची संधी मिळणार असून, कार्यशाळेतून तयार झालेल्या मूर्ती घरी बसविण्याचा आनंद मिळणार आहे असे अहिल्यानगरचे अध्यक्ष प्रसाद भणगे यांनी सांगितले.

कलात्मकतेसोबतच पर्यावरणाची जबाबदारी घेणारे उद्याचे नागरिक घडवणे हाच या उपक्रमामागचा खरा हेतू आहे, यावेळी पारंपरिक मूर्ती घडवण्याच्या प्रक्रियेबरोबरच रंगकाम व सजावटीचे बारकावे देखील शिकवले जातील असे कालारंगच्या संचालिका आणि परिषदेच्या उपाध्यक्ष सुजाता पायमोडे यांनी सांगितले.

कार्यशाळेसाठी २०० रु. प्रवेश शुल्क असून शाडू माती आयोजक पुरवणार आहेत. यासाठी घरून येताना पाट किंवा फळी बरोबर ठेवायची आहे. हि कार्यशाळा २४ ऑगस्ट रोजी सकाळी ९ वाजता, कमलाबाई नवले हॉल, गुलमोहर रोड येथे होणार असून, इच्छुकांनी ९४२०७४९४९७ किंवा ९२२५३१६६१५ या संपर्क क्रमांकावर पूर्वनोंदणी करून कार्यशाळेत सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## जिल्ह्यात ॲग्रीस्टॅक योजनेत ७ लाख शेतकऱ्यांची नोंदणी पूर्ण; शेतकऱ्यांच्या डिजिटल ओळखीच्या अभियानास वेग

नगर – शेतकऱ्यांना डिजिटल ओळख देऊन त्यांना सरकारी योजनांचा लाभ सुलभतेने मिळवून देणाऱ्या 'ॲग्रीस्टॅक' योजनेला अहिल्यानगर जिल्ह्यात प्रचंड प्रतिसाद मिळत आहे. जिल्ह्यात एकूण १३ लाख ३५ हजार १२ शेतकऱ्यांपैकी ७ लाख २० हजार १७१ शेतकऱ्यांनी या योजनेत ओळखपत्रासाठी नोंदणी केली असून, यामुळे ५२.४५ टक्के काम यशस्वीरीत्या पूर्ण झाले आहे. या मोहिमेत शेवगाव तालुक्याने शेतकरी संख्येच्या तुलनेत सर्वाधिक ४९,८५७ शेतकऱ्यांची नोंदणी करून (७५.८८ टक्के) जिल्ह्यात सर्वाधिक प्रगती साधली आहे. ही योजना खऱ्या अर्थाने कृषी क्षेत्राला डिजिटल युगात घेऊन जाणारे एक महत्त्वाचे पाऊल ठरत आहे.

जिल्ह्यातील विविध तालुक्यांमध्येही ही मोहीम जोमाने सुरू असून, शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात सहभाग घेतला आहे. कोपरगावमध्ये ३९,१९१ शेतकऱ्यांनी नोंदणी पूर्ण केली (६५.४६ टक्के), श्रीरामपूरमध्ये २९,३८० (६३.६० टक्के), नेवासा ७२,६४८ (५९.६९ टक्के) आणि राहुरी ४९,३३३ (५६.८० टक्के) शेतकऱ्यांनी नोंदणी केली आहे. त्याचप्रमाणे, कर्जत तालुक्यात ५०,७३० (५५.६६ टक्के), राहाता ३६,२६२ (५४.६६ टक्के), जामखेड ४१,५४८ (५०.४९ टक्के), अकोले ४३,१३९ (४९.१७ टक्के), संगमनेर ७५,१६५ (४९.२९ टक्के), पाथर्डी ५५,०४७ (४८.७० टक्के), पारनेर ६७,४५१ (५३.१९ टक्के), अहिल्यानगर ४६,४३५ (३९.०७ टक्के) आणि श्रीगोंदा तालुक्यात ६३,९८५ (५५.१५ टक्के) शेतकऱ्यांनी नोंदणी करून आपले योगदान दिले आहे. ही आकडेवारी जिल्ह्याभरातील शेतकऱ्यांचा या योजनेवरील विश्वास दर्शवते.

कृषी क्षेत्रात डिजिटल सेवांचा वापर वाढवून शासनाच्या विविध योजनांचा लाभ शेतकऱ्यांना जलद व पारदर्शक पद्धतीने देणे सुलभ व्हावे, याकरिता केंद्र शासनाने १४ ऑक्टोबर २०२४ पासून महाराष्ट्रासह देशातील २४ राज्यांमध्ये 'ॲग्रीस्टॅक' योजना राबविण्यास सुरुवात केली आहे. या योजनेचा मुख्य उद्देश शेतकऱ्यांची आधार क्रमांकाशी संलग्न माहिती एकत्रित करून त्यांना एक विशिष्ट ओळख क्रमांक प्रदान करणे, तसेच केंद्र व राज्य शासनाच्या कृषी योजनांचा त्वरित लाभ मिळवून देणे हा आहे.

'ॲग्रीस्टॅक' योजनेत शेतकऱ्यांना मिळणाऱ्या डिजिटल ओळखपत्रामुळे अनेक फायदे होणार आहेत. यात प्रधानमंत्री सन्मान निधी योजनेचा लाभ अधिक जलद व सुलभ होईल, शेतकऱ्यांसाठी कर्ज प्रक्रिया वेगवान होईल आणि त्यांना शेतीविकासासाठी अधिक सहाय्य मिळेल. यासोबतच, शेतकऱ्यांना बाजारपेठेपर्यंत अधिक सुलभ प्रवेश मिळेल, सरकारी कार्यालयांना वारंवार भेटी न देता डिजिटल सेवांचा लाभ घेता येईल, आणि शेतकऱ्यांना नव्या योजनांची माहिती तात्काळ मिळणार आहे. पीक विमा तसेच आपत्ती व्यवस्थापनांतर्गत शेतकऱ्यांचे नुकसान भरपाईसाठी सर्वेक्षण करणे सुलभ होईल. तसेच, किमान आधारभूत किंमतीवर खरेदीमध्ये शेतकऱ्यांची नोंदणी ऑनलाईन पद्धतीने होऊ शकेल.'ॲग्रीस्टॅक' ओळखपत्रासाठी शेतकऱ्यांना सीएससी केंद्र, तलाठी, कृषी सहाय्यक किंवा ग्रामविकास अधिकारी यांच्यामार्फत https://mhfr.agristack.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन नोंदणी करता येते. ज्यांना ऑनलाईन प्रक्रिया अवघड वाटते, त्यांच्यासाठी गावपातळीवर महसूल विभागाच्यावतीने विशेष मोहीम राबवली जात आहे. या मोहिमेत शेतकऱ्यांचा आधारकार्ड क्रमांक त्यांच्या सातबारा उताऱ्याबरोबर जोडण्यात येऊन त्यांची 'ग्रीस्टॅक' योजनेत मोफत नोंदणी करण्यात येत आहे. ही मोहीम प्रत्येक शेतकऱ्याला डिजिटल युगाशी जोडण्यासाठी एक महत्त्वाचे पाऊल आहे.

## डॉक्टर रवींद्र कवडे सर यांच्या ८३ व्या वाढदिवसाच्या निमित्ताने...



सर्वसाधारणपणे कुस्तीगीर, मल्ल म्हणजे डोळ्यासमोर ताकदवान, कमावलेले शरीर असलेली व्यक्ती उभी राहते. असा समज आहे की पैलवान म्हणला की फार फार तर पदवी पर्यंत शिक्षण असलेली व्यक्ती, पण हा समज खोटा ठरवणारे आणि पी एचडी मिळवलेले माझे मार्गदर्शक व स्नेही असलेले डॉक्टर रवींद्र कवडे सर आज त्यांच्या ८३ व्या वर्षात पदार्पण करत आहेत त्या निमित्ताने शुभेच्छा......

या बहु आयामी व्यक्तिमत्वाचा जन्म २० ऑगस्ट १९४२ मध्ये एका देशप्रेमी व समाज कार्याची परंपरा असलेल्या खानदानी कुटुंबात झाला. वडील रभाजीराव हे लोकप्रिय व्यक्ती होते. देशप्रेम कुटुंबाच्या नसानसात असल्याने रवींद्रच्या मातोश्री सौ. जानकीबाई कवडे यांनी इंग्रज राजवटी विरुद्ध सत्याग्रह केला. त्यांना तीन महिन्याचा कारावास व पन्नास रुपयांचा दंड अशी शिक्षा झाली. त्यावेळेस त्यांच्या कडेवर केवळ २१ दिवसाचा बाळ रवींद्र होता. जेलरने सांगितले की मुलगा लहान आहे. तुम्ही माफी मागत असाल तर शिक्षा माफ करतो परंतु सौ. जानकी बाईनी प्राण गेला तरी हरकत नाही, पण माफी मागणार नाही' असे बाणेदार उत्तर दिले. हाच बाणेदारपणा छोट्या रवींद्रच्या आयुष्याचा आधार झाला.

रवींद्र याने शालेय शिक्षणाबरोबर मल्लविद्येत प्राविण्य मिळवले. छोट्या छोट्या कुस्त्यांपासून ते देशपातळीवरील मोठ्या कुस्त्यांचे आखाडे त्यांनी गाजवले. अखिल भारतीय स्तरावर पुणे विद्यापीठातर्फे भाग घेऊन कुस्तीगीर म्हणून नाव कमावले आहे. या स्पर्धा बनारस, उज्जैन, जबलपूर, कोल्हापूर या ठिकाणी घेतल्या गेल्या आहेत. विशेष म्हणजे या स्पर्धा राष्ट्रीय स्तरावर आयोजित केल्या जातात. १९६४ मध्ये बिगर शालेय क्रीडा स्पर्धा नागपूर मध्ये झाल्या, तेथे त्यांनी सुवर्णपदक मिळवले. त्याचप्रमाणे देश स्तरावर विद्यापीठ कुस्तीच्या स्पर्धा झाल्या, यात पुणे विद्यापीठाने सुवर्णपदके मिळवली, त्यात श्री. कवडे यांचा प्रमुख सहभाग होता. तर, नवव्या जागतिक क्रीडा मेळावा बर्लिन पूर्व जर्मनी १९७३ मध्ये हंगेरी बुडापेस्ट इथे झालेल्या जागतिक स्पर्धेत त्यांनी ब्रांझ पदक मिळवलेले आहे.

कुस्ती क्षेत्रात प्राविण्य मिळवत असताना त्यांनी एम. ए., पी. एच. डी. पूर्ण केली, त्याचप्रमाणे एन. आय. एस. पतीयाळा मध्ये डी.पी.एड. सुद्धा पूर्ण केले.

डॉक्टर रवींद्र कवडे सर हे नुसतेच नावाजलेले मल्ल नसून शिक्षक, प्राध्यापक व कुशल संघटक आहेत. त्याचबरोबर आंतरराष्ट्रीय कीर्तीचे ते कुस्तीच्या क्षेत्रातील पंच आहेत. जागतिक दर्जाच्या कुस्त्यांमध्ये त्यांनी पंच म्हणून उत्तम कामगिरी बजावून भारताचे नाव पुढे नेले आहे.

पूर्व जर्मनीमधील आंतरराष्ट्रीय खेळाची कुस्ती पदवी परीक्षा उत्तम श्रेणीमध्ये पास केली. जर्मन व इंग्रजी भाषेवर त्यांचे प्रभुत्व असल्याने त्यांनी आंतरराष्ट्रीय क्रीडा क्षेत्रातील जर्मन तज्ञ श्री. मिलॉन इरसेगन यांचे जर्मनीमधील व्याख्यानाचे व्यासपीठावरच इंग्रजीमध्ये भाषांतर करून सर्वांना चकित केले.

आंतरराष्ट्रीय कुस्तीच्या दर्जाचे शिक्षण घेताना त्यांनी पंचाचे सुद्धा शिक्षण घेतले व आंतरराष्ट्रीय क्षेत्रामध्ये कुस्तीचे पंच म्हणून नाव कमावले त्यांच्या निर्णयाला सर्वांनीच मान्यता दिलेली आहे. तसेच, एन.एस.आय. पतीयाला येथील कॉलेजमध्ये पदवी परीक्षेला मार्गदर्शक म्हणून त्यांची नियुक्ती पाच वर्षे झाली होती. वृत्तपत्रे मासिके परिसंवाद भाषणे यामधून त्यांनी कुस्ती संबंधी बहुमोल मार्गदर्शन केले आहे त्यांनी क्रीडा कुस्ती विषयावर लिहिलेल्या पुस्तकांच्या आवृत्तींची संख्या १००० पेक्षा जास्त आहे. ही पुस्तके मराठी, हिंदी, इंग्रजी मध्ये आहेत.

महाराष्ट्र राज्य पत्रिका संघटनेचे अध्यक्ष हे पद भूषवित त्यांनी आंतरराष्ट्रीय आशिया कुस्ती स्पर्धाचे नियोजन अनेक वेळा केले आहे. १९८६, १९८४, २००६ मध्ये भारतीय कुस्तीचे डब्ल्यू. एफ. आय. जागतिक कुस्ती स्पर्धेसाठी जर्मनी, इंग्लंड, अटलांटिया, टर्की येथे प्रशिक्षक व्यवस्थापक म्हणून त्यांची निवड झाली होती. जागतिक स्पर्धा जर्मनी १९८६, ग्रेट ब्रिटन मॅचेस्टर येथेही त्यांनी सदस्य म्हणून काम केले आहे. तसेच, अमरावती येथील प्रसिद्ध हनुमान क्रीडा प्रसारक मंडळ येथील व्यायाम शाळेत १९७६ ते १९८० पर्यंत क्रीडा शिक्षक म्हणून त्यांचे मार्गदर्शन संस्थेने घेतलेले आहे.

कुस्ती क्षेत्रात नगरचे नाव उंचावत असताना त्यांनी सामाजिक कार्यही केलेले आहे. अहिल्या नगर मधील हिंद सेवा मंडळ व समर्थ मंडळ याचेही सदस्यत्व त्यांना मिळालेले आहे. भिंगार जवळ आलमगीर परिसरामध्ये गरिबांची मुले दूरवरच्या शाळेत जात होती, तेथे शाळेची गरज असल्याने त्यांनी स्वर्गवासी स्वातंत्र्य सैनिक जानकीबाई कवडे नावाने एक संस्था स्थापन करून पहिली ते दहावी पर्यंतच्या शिक्षणाची गरीब मुलांसाठी व्यवस्था केली.

आजही त्या परिसरामध्ये ही संस्था नावाजलेली म्हणून ओळखली जाते. यातील सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे त्या शाळेसाठी त्यांनी स्वतःची जमीन दिली आहे त्याचप्रमाणे बांधकाम ही केले आहे यासाठी त्यांनी कोणाचीही मदत घेतली नाही.

ते स्वातंत्र्य सैनिक असल्यामुळे साहजिकच नगर जिल्ह्यातील स्वातंत्र्य सैनिक संघटनेशी त्यांचा परिचय आहे. आज अहिल्यानगर स्वातंत्र्यसैनिक व उत्तराधिकारी संघटना गृहनिर्माण सोसायटीचे ते अध्यक्ष असून आम्हा सर्वांसाठी उत्तम मार्गदर्शक आहेत.

त्यांचा व आमच्या घराचा पूर्वापार संबंध आहे. माझे वडील श्री. गंगाधर धर्माधिकारी हे स्वातंत्र्यसैनिक होते. साहजिकच कुटुंबाबरोबर मनेही एकत्र जोडलेली आहेत. माझे धाकटे बंधू कैलासवासी शिरीष हे कित्येक वर्ष संघटनेचे काम त्यांच्या मदतीने करत होते. त्यामुळे हा स्नेह अधिकच वृद्धिंगत झालेला आहे. स्वातंत्र्य सैनिकाच्या संघटनेच्या कामासाठी त्यांनी आम्हाला बरोबर घेऊन अनेक आंदोलने व सत्याग्रह केलेले आहेत. मंत्र्यांसमोर निवेदन ही दिलेले आहे व चर्चाही केलेली आहे. स्वातंत्र्य सैनिक संघटनेचे ते प्रमुख आधारस्तंभ आहेत. अहिल्यानगर स्वातंत्र्यसैनिक व उत्तर अधिकारी संघटनेमार्फत त्यांना खूप खूप शुभेच्छा व परमेश्वर त्यांना दीर्घायुष्य देवो ही ईश्वरचरणी प्रार्थना......

**– चंद्रशेखर धर्माधिकारी**

अध्यक्ष, स्वातंत्र्य सैनिक व उत्तराधिकारी संघटना, अहिल्यानगर

## विवाहितेचा छळ करुन विष पाजून ठार करण्याचा प्रयत्न; पाच आरोपी निर्दोष

नगर – मौजे नागापूर गावात बोल्हेगांव फाटा येथे प्लॉट नं.५४ मध्ये फिर्यादीचे राहते घरामध्ये २८/१२/२०१० रोजीचे ३ महिन्यानंतर ते ८/०३/२०१४ पावेतो आरोपी क्र.१ आशा कुशाबा निमसे (सासू), २.कुशाबा गोविंद निमसे (सासरा), ३. राहुल कुशाबा निमसे (दिर), ४. रविंद्र कुशाबा निमसे (पती), ५. अभय सदाशिव दुसंगे (नंदावा) या सर्वांनी संगनमत करुन फिर्यादी हि आरोपी क्र. ४ रविंद्र याची पत्नी म्हणून सासरी नांदत असताना या सर्व आरोपींनी तिने माहेरहून जमीन घेण्यासाठी १० लाख रुपये घेऊन ये या कारणावरुन तिला सतत मारहाण करुन तिचा शारिरीक व मानसिक छळ करुन तिला ८/०३/२०१४ रोजी दुपारी १२.३० वा.चे सुमारास यातील आरोपी क्र. १ ते ३ व ५ यांनी पकडून बेडरुममध्ये नेऊन आरोपी क्र. ४ रविंद्र याने फिर्यादीचे तोंडात विषारी औषध ओतून जिवे ठार मारण्याचा प्रयत्न केला म्हणून फिर्यादीच्या फिर्यादीवरुन एम.आय.डी.सी. पोलिसांनी आरोपी क्र. १ ते ५ यांचे विरुध्द भा.दं.वि. कलम ३०७, ४९८अ, अन्वये गुन्हा दाखल केला होता.

सदरच्या खटल्यात फिर्यादीने आपले माहेरी छळ होत असलेबाबत पाठविलेले अंतर्देशियपत्र होते. तसेच रुग्णालयात दाखल असतांना व उपचारा दरम्यान फिर्यादीचे पोटातील द्रव पदार्थ राखून ठेऊन तो प्रयोग शाळेकडे पाठविला असता, त्यातही विषाचे अवशेष असल्याचा अहवाल होता.

आरोपींचा बचाव होता की, हे अंतर्देशीयपत्र याबाबत ते सत्य आहे असे वाटत नाही. तर तो ठरवून खोटा पुरावा तयार केला आहे, कारण त्यामध्ये पत्र पाठवल्याची तारीख व त्यानंतर जवळ जवळ १ महिन्याने तें पोहोचले. त्यावरुन संशय निर्माण होतो. तसेच सन २०१३ पासून फिर्यादी हि माहेरी राहत असल्याने व तिला नांदायला येण्याची नोटीस देण्यात आली होती व न्यायालयात वैवाहीक वाद प्रलंबित होता. यावरुन घटना घडली, तेंव्हा ती सासरी नांदत होती याबद्दल संशय निर्माण होतो तर ती माहेरीच होती त्यास बळकटी येते त्यामुळे सर्व आरोपींनी हातपाय पकडून विष पाजण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. सदरचा बचाव जिल्हा न्यायालयाने मान्य केला व सर्व आरोपींची संशयाचा फायदा देऊन निर्दोष मुक्तता केली. फिर्यादी हि न्यायसंस्थेमध्ये लघु लेखक म्हणून कार्यरत आहे. आरोपींतर्फे ॲड. सतिशचंद्र सुद्रिक यांनी काम पाहिले.

## 'एसएमपी इंटरियर डिझाईन असोसिएट'चे उद्घाटन

नगर – स्वातंत्र्य दिनाच्या मुहूर्तावर एसएमपी इंटरियर डिझाईन असोसिएट ऑफिसचे उद्घाटन झाले. संचालक सईद पठाण यांच्या मातोश्रींच्या हस्ते रिबीन कापून उद्घाटन सोहळा झाला.

प्रमुख पाहुणे म्हणून कोतवाली पोलिस स्टेशनचे निरीक्षक प्रताप दराडे, उपजिल्हाधिकारी सय्यद वसीम, हाजी करीम हुंडेकरी, एन आर लॉनचे हाजी नजीर अहमद, न्यु मॉडर्न कन्सट्रक्शनचे इकबाल सय्यद, केअर एन क्युअर हॉस्पिटलचे डॉ. सईद शेख, कॉन्ट्रॅक्टर चांद शेख, अब्दुल सलाम, सय्यद परवेज, मदरसा आलमगीरचे हाफीज हाजी रीयाज, कॉन्ट्रॅक्टर उस्मान इनामदार, कॉन्ट्रॅक्टर रफिक भाई, फिरोज जहागीरदार, कवीजंग लॉनचे वसीम भाई, हाजी मिर्झा, अर्शद भाई, मतीन भाई उपस्थित होते. मतीन व अर्शद यांनी आभार मानले.


एसएमपी इंटरियर डिझाईन असोसिएट ऑफिसचे उद्घाटन करताना संचालक सईद पठाण यांच्या मातोश्री आदी.

# कॅलिडोस्कोप



## कलिंगडाचे वजन १५९ किलो!

कलिंगड उन्हाळ्यात शरीराला थंडावा देते आणि ताजेतवाने ठेवते. एका अशा कलगडाची चर्चा ऐकून कुणीही थक्क होईल. हे कलिंगड इतके मोठे होते, की त्याला उचलायला क्रेनची मदत घ्यावी लागली. जगातील सर्वात मोठे कलगड जगासाठी चर्चेचा विषय बनले होते. या विशाल कलगडाचे वजन इतके होते, की त्याला सामान्य माणसाने उचलण शक्यच नव्हते. २०१३ मध्ये अमेरिकेच्या क्रिस केंट यांनी हे कलिंगड पिकवले होते. त्यांच्या मेहनतीचे फळ म्हणून या कलगडाचे वजन तब्बल १५९ किलो भरले, जे 'द वर्ल्ड रेकॉर्ड ऑफ गिनीज बुक' मध्ये नोंदवले गेले. हे कलिंगड एका साधारण कलिंगडापेक्षा १५ पट जास्त जड होते. त्यामुळे ते उचलण्यासाठी विशेष यंत्रणा लागली. क्रिस केंट यांनी स्वतःच्या खास बियांपासून हे कलगड पिकवले होते. प्रदर्शनासाठी ते घेऊन जाण्यासाठी त्याला क्रेनचा वापर करावा लागला. हे बघण्यासाठी आजूबाजूच्या लोकांची मोठी गर्दी झाली होती. या घटनेने सर्वांनाच आश्चर्यचकित केले होते. हे कलगड क्रेनने उचलून एका खास जागी ठेवले होते, जेणेकरून त्याचे वजन आणि आकार सर्वसामान्यांना पाहता येईल. भारतात कलगडाची शेती उन्हाळ्यात मोठ्या प्रमाणात केली जाते. भारतात एकूण कलगड उत्पादन सुमारे २,४९५ हजार टन आहे. कलिंगडात सुमारे ९२ टक्के पाणी असल्यामुळे ते शरीराला थंड ठेवते आणि पाण्याची कमतरता दूर करते. याशिवाय, कलगडात अनेक जीवनसत्त्वे आणि पोषक घटक असतात, जे आरोग्यासाठी फायदेशीर ठरतात.


**भारतात कोणत्या राज्यात जास्त उत्पादन?**

उत्तर प्रदेश हे भारतात सर्वात जास्त कलिंगडाचे उत्पादन घेणारे राज्य आहे. येथील सुपीक जमीन आणि हवामान कलिंगड पिकवण्यासाठी खूप अनुकूल आहे. २०२१-२२ मध्ये उत्तर प्रदेशमध्ये १६.८६ हजार हेक्टर जमिनीवर कलिंगडाची शेती झाली होती, जे भारतातील एकूण उत्पादनाचा सर्वात मोठा भाग होते. २०२४ मध्येही उत्तर प्रदेशातच कलिंगडाची सर्वाधिक शेती झाली.

## आवाजाचे नोट्समध्ये रूपांतर करणारे मशीन

केरळच्या अभियांत्रिकीच्या काही विद्यार्थ्यांनी एक मशीन बनवले आहे. ते आवाज ऐकते आणि ते हस्तलिखित नोट्समध्ये रूपांतरित करते. हे आश्चर्यकारक मशीन लिहिता येत नसणाऱ्यांसाठी उपयुक्त ठरेल. सोशल मीडियावर या शोधाची खूप चर्चा होत आहे. केरळच्या विद्यार्थ्यांनी 'एआय' मशीन मॉडेल बनवले आहे. अभियांत्रिकीचा अभ्यास करणारा विद्यार्थी अजय एच. आणि त्याच्या टीमने एक अनोखे मशीन बनवले आहे. या मशीनचे नाव 'टॉक टू राइट' आहे. तुम्हाला फक्त बोलायचे आहे आणि मशीन तुमचे बोललेले शब्द कागदावर लिहिते. हे मशीन नुकतेच 'एन्टे केरलम एक्स्पो' नावाच्या एका मोठ्या सरकारी कार्यक्रमात दाखवण्यात आले.

अजयच्या म्हणण्यानुसार हे मशीन बोललेले शब्द जसे आपण हाताने लिहितो तसेच लिहिते. मशीनला एक मायक्रोफोन जोडलेला असतो. समोरची व्यक्ती बोलल्यानंतर ऐकून घेणारे मशीन हळूहळू ए-४ कागदावर त्याच्या पेनने लिहिते. तेही अगदी सुबक अक्षरात, ओळीमध्ये. फक्त बोलून, ते कागदावर आज्ञा लिहिते. हे मशीन बनवण्यासाठी रास्पबेरी पाई, आर्डिनो (जीआरबीएल) आणि पायथॉन नावाच्या तंत्रज्ञानाचा वापर केला गेला आहे. या सर्व तंत्रज्ञानाचा वापर संगणक, रोबोट आणि प्रोग्रामगमध्ये केला जातो; परंतु अजय आणि त्याच्या टीमने त्यांचा वापर डिजिटल स्क्रिब (म्हणजे तुमच्या वतीने लिहू शकणारा सहाय्यक) बनवण्यासाठी केला आहे. याचा सर्वात मोठा फायदा शारीरिकदृष्ट्या कमकुवत लोकांना होईल. हाताने लिहू न शकणारे कवा बोलून काम करू इच्छिणाऱ्यांना हे तंत्र कुठेही उपयुक्त ठरू शकते, मग ते शाळा, ऑफिस कवा घर असो..



## स्वतः बॅटरी बदलणारा रोबो


कल्पना करा, तुमचा मोबाईल स्वतः चार्जिंग स्टेशनवर जाऊन त्याची बॅटरी काढून नवीन बॅटरी लावत असेल तर... तर तुम्हाला कसे वाटेल? आता एका रोबोटनेही असेच काम केले आहे. रोबो बनवणाऱ्या चीनच्या प्रसिद्ध यूबी टेक रोबोटिक्स कंपनीने वॉकर एस२ नावाचा मानवासारखा भासणारा रोबो बनवला आहे. या रोबोने असा जुगाड बनवला आहे, की आता त्याला थांबून चार्ज करण्याचीही गरज नाही. बॅटरी कमी होते, तेव्हा तो स्वतः बॅटरी बदलणाऱ्या स्टेशनवर जातो आणि त्याची एक बॅटरी काढून चार्जिंगवर ठेवतो आणि दुसरी पूर्ण चार्ज असलेली बॅटरी लावतो. नंतर तो न थांबता पुन्हा कामाला लागतो. हे अद्भूत तंत्रज्ञान दुहेरी बॅटरी सिस्टीमवर काम करते. म्हणजे त्यात दोन बॅटरी आहेत. ही सिस्टिम एका बॅटरीसह काम करते आणि तुम्हाला हवे तेव्हा दुसरी बदलू शकते. यामुळे ती कधीही बंद करावी लागत नाही. चार्जिंगचा त्रास नाही, व्यत्यय येत नाही. एक बॅटरी संपू लागते, तेव्हा रोबो काय करायचे ते समजून घेतो. जणू एखाद्या माणसाला भूक लागली आहे आणि तो कोणालाही न सांगता स्वतः जाऊन अन्न खातो. तशीच या रोबोटची बॅटरी बदलण्याची संपूर्ण प्रक्रिया खूप सोपी आणि मजेदार आहे. वॉकर एस२ त्याच्या हातांनी मागच्या बाजूला जोडलेली बॅटरी काढून शेल्फमध्ये ठेवतो आणि तिथून एक नवी बॅटरी काढून आत घालतो. हे काम करण्यासाठी त्याला फक्त काही मिनिटे लागतात. त्याला कोणत्याही मदतीची आवश्यकता पडत नाही कवा कोणत्याही सूचनांची आवश्यकता रहात नाही. तो हे सर्व स्वतः करतो. ही



प्रणाली चीनमधील काही इलेक्ट्रिक कारसारखी आहे, जिथे बॅटरी चार्ज करण्याऐवजी थेट त्या बदलल्या जातात. सोशल मीडिया वापरकर्ते त्यावर वेगवेगळ्या प्रकारच्या प्रतिक्रिया देत आहे. एका वापरकर्त्याने लिहिले, 'मानव स्वतः श्वास घेऊ शकतात आणि खाऊ शकतात, रोबो ही आता नवी गोष्ट राहिलेली नाही.' दुसऱ्या वापरकर्त्याने लिहिले, 'रोबो एके दिवशी सर्व मानवांना खातील. दुसऱ्या एका वापरकर्त्याने लिहिले, एक दिवस जगात फक्त रोबो असतील आणि माणूस पुस्तकांमध्ये अस्तित्वात असेल.

## ये दोस्ती...

युरोपमधल्या पर्वतरांगांमध्ये आढळणारा मेर्मोट हा प्राणी लाजराबुजरा आहे. मेर्मोट माणसांजवळ जात नाही. तो बिळामध्ये राहतो. माणसं जवळ आली की लगेच बिळात निघून जातो. मेर्मोट खूप चपळ असतो. शेकरू कवा खारीसारखा दिसणारा मेर्मोट खूप गोंडस असतो. ऑस्ट्रियाचा मेटियो वॉच या मेर्मोटचा मित्र आहे. प्राणी आणि माणसाच्या मैत्रीच्या बऱ्याच कथा आपण ऐकल्या आहेत. मेर्मोट आणि मेटियो यांची मैत्रीही अशीच अनोखी आहे. गेल्या अकरा वर्षांपासून मेर्मोट आणि मेटियो यांच्यात मैत्रीचे बंध जुळले आहेत. मेटियो दरवर्षी या मेर्मोटना भेटायला येतो. मेटियो आल्यावर मेर्मोट खूप खूश होतात. १४ वर्षांचा मेटियो इन्सबूकला राहतो. २०१२ मध्ये मेटियो आणि मेर्मोटमधली ही मैत्री चर्चेचा विषय ठरली होती. मेर्मोट आणि मेटियो यांच्यात मैत्री नेमकी कशी झाली हे कोणालाही माहीत नाही. पण हे मेर्मोट मेटियोला अजिबात घाबरत नाहीत. उलट, त्याच्यासोबत खेळतात. मेटियोची आई मेर्मोट आणि मेटियोचे फोटोही काढते. मेटियोची अगदी लहानपणीच मेर्मोटशी मैत्री झाली होती.






## त्या शिकवतात वाहतुकीचे नियम


लोकांनी वाहतुकीचे नियम पाळले तर अपघात बऱ्याच अंशी कमी होऊ शकतात, अनेकांचे जीव वाचू शकतात. वाहतूक पोलिसांकडून नागरिकांना वेळोवेळी सूचना दिल्या जातात. जागरूकता मोहिमा राबवल्या जातात. पण नागरिकांकडून म्हणावा तसा प्रतिसाद मिळत नाही. म्हणूनच इंदूरमधल्या वृंदा नावाच्या महिलेने ही जबाबदारी आपल्या खांद्यांवर घेतली. ५८ वर्षांच्या वृंदाताई दररोज संध्याकाळी चार ते सहा या वेळेत वाहतूक पोलिसाच्या भूमिकेत असतात. नव्या वर्षात लोकांना वाहतुकीच्या नियमांप्रती जागरूक करण्याचा संकल्प त्यांनी सोडला आहे. त्या तासभर विजयनगर चौकात आणि तासभर सयाजी चौकात हा उपक्रम राबवतात. वाहनांना थांबवून वाहतुकीच्या नियमांबाबत सजग करतात. म्हणूनच वृंदा या भागात बऱ्याच लोकप्रिय झाल्या आहेत. इंदूरला स्वच्छतेच्या बाबतीत पहिला क्रमांक मिळाला आहे. मात्र आता वाहतुकीच्या नियमांबाबतही शहराला पहिला क्रमांक मिळायला हवा, असं त्यांना वाटतं. म्हणूनच त्यांचे प्रयत्न सुरू आहेत.

## २२ वर्षे मेकअप! चेहराच बनला भीतीदायक

मेकअप करायला कोणाला नाही आवडत?, छान दिसण्यासाठी, चेहऱ्याला उठाव देण्यासाठी, सौंदर्य वाढवण्यासाठी मेकअप करायला बहुतांश लोकांना आवडते; पण मेकअप केल्यानंतर, दिवसाअखेर कवा झोपायला जाण्यापूर्वी मेकअप काढून चेहरा स्वच्छ धुणे गरजेचे असते. अनेक सौंदर्यतज्ज्ञही हाच सल्ला देतात; मात्र मेकअप काढून चेहरा नीट धुतला नाही तर काय होऊ शकते याचा तुम्ही कधी विचार केला आहे का? चीनमधील गाओ या महिलेने कधीही विचार केला नव्हता की तिच्यासोबत असे काहीतरी वाईट घडेल. ती वीस वर्षे दररोज मेकअप करत होती; पण तो काढणे कवा उतरवणे, चेहरा धुणे याची तिला झंझट, कटकट वाटायची. दुसऱ्या दिवशी सकाळी पुन्हा मेकअप लावावा लागणारच असेल, तर रात्री तो का धुवावा, असा विचार ती करायची; पण त्याचा परिणाम खूप भयानक झाला. आता तिच्या चेहऱ्याची अवस्था इतकी वाईट झाली आहे, एवढी



ॲलर्जी झाली की तिला ओळखणेच शक्य नाही. चेहरा एवढा सुजला, की साधे घाराबेहर पडण्याचीदेखील तिला भीती वाटू लागली. चीनमधील या महिलेचे नाव गाओ असे आहे. तिने स्वानुभवातून आता 'सोशल मीडिया'वर सर्वांना इशारा दिला आहे. मेकअप केल्यानंतर तो नीट काढणे, मेकअप उतरवणे, चेहरा व्यवस्थित धुणेही खूप महत्वाचे आहे. तिने स्वतः २० वर्षे मेकअप केला; पण कधीही तिचा चेहरा व्यवस्थित स्वच्छ केला नाही. ती चेहरा फक्त पाण्याने धुवायची आणि सकाळी चेहऱ्यावर पुन्हा मेकअप थापायची. सुरुवातीला सगळे व्यवस्थित चालले होते; पण या वर्षी इतकी ॲलर्जी झाली, की तिचा चेहरा पूर्णपणे सुजला. इतके की, तिला ओळखणेही कठीण झाले. असे वाटले की हजारो मुंग्या चेहऱ्यावर धावत आहेत. तिला प्रचंड खाज सुटते, तिचा चेहरा सुरकुत्याने भरलेला आहे आणि भीतीमुळे तिने लोकांना भेटणेही बंद केले आहे. सुरुवातीला, तिने डॉक्टरांकडे जाण्याऐवजी स्किन क्लिनिकमध्ये जाऊन इंजेक्शन घेतले; पण त्यामुळे तिची प्रकृती आणखी बिकट झाली. या अनुभवावरून धडा घेऊन गाओ आता सर्वांना समजावून सांगते, की कोणताही मेकअप करा; पण झोपण्यापूर्वी चेहरा व्यवस्थित स्वच्छ करणे आवश्यक आहे. फक्त पाण्यानेच नाही, तर चांगल्या फेसवॉशने. अन्यथा चेहरा सुंदर नाही, तर भयानकही बनू शकतो असा इशारा तिने दिला.




## ट्रेडमिलचा देशी जुगाड!

आता तुम्हाला ट्रेडमिलवर धावण्यासाठी जिम फी भरण्याची गरज नाही, ना तुम्हाला वीज बिलाची काळजी करण्याची गरज आहे, ना मोटार बिघाडाची भीती. कारण देशी मनाने असा जुगाड केला आहे, की तो पाहून परदेशी मशीन्सनाही लाज वाटेल. आता एक चित्र बघा. गावाच्या एका कोपऱ्यात एक ट्रेडमिल उभी आहे; पण ती सामान्य नाही, ती पूर्णपणे देशी आहे. ती बॅटरीवर ना बॅटरीवर चालते, ना करंटवर. तिला चमकदार स्क्रीन नाही; मात्र त्यात चिखल, निसरडा, जलद वाहणारा नळ आणि स्टँड आहे. गावातील रस्त्यांवर बनवलेल्या या अनोख्या ट्रेडमिलला कोणताही बेल्ट नाही. त्याऐवजी एक छोटा स्टील स्टँड आहे, जो जमिनीत गाडलेला आहे. ती व्यक्ती तो स्टँड धरते. त्याच्या खाली ओली, चिकट, निसरडी कच्ची माती पसरली आहे. जेव्हा एखादी व्यक्ती तिथे उभी राहून पाय हलवू लागते, तेव्हा पुढे सरकत नाही; पण त्याच्या पायांचा व्यायाम होतो. शहरातील लोक जिथे विचार करून थकतात, तिथे गावकरी विचार करतात. सर्वात खास गोष्ट म्हणजे त्यात बसवलेला पाण्याचा नळ. स्टँडच्या एका कोपऱ्यात बसवलेला हा नळ उच्च दाबाने पाणी सोडतो. त्यामुळे माती सतत ओली राहते. आणि जेव्हा माती ओली असते, तेव्हा घसरण वाढते. जेव्हा घसरण वाढते, तेव्हा शर्यतदेखील त्यानुसार वेगवान दिसते. परिणामी माणूस त्याच ठिकाणी राहतो आणि स्वतःला थकवतो.



## मंगळ मोहिमेसाठी विनोदवीर

सध्या मंगळ ग्रहाबद्दल प्रचंड उत्सुकता निर्माण झाली आहे. भारतानेही मंगळयान मोहीम राबवली आहे. चंद्रानंतर आता मंगळ ग्रहावर जीवसृष्टीचा शोध घेतला जात आहे. मात्र पृथ्वीवरून मंगळावर जाणं खूप कठीण आहे. चंद्र पृथ्वीपासून जवळ आहे. पण मंगळाचं तसं नाही. नासा या अमेरिकेतल्या अंतराळ संशोधक संस्थेने मंगळ मोहिमेच्या अडचणींची एक यादी तयार केली. त्यात पृथ्वी आणि मंगळ ग्रहामधलं अंतर, तिथलं वातावरण अशा काही बाबींचा समावेश होता. मंगळ ग्रहावर मोठ्या प्रमाणावर किरणोत्सर्ग होतो. मंगळाचं कोणतंही चुंबकीय क्षेत्र नसल्यामुळे या किरणोत्सर्गाचं प्रमाण बरंच जास्त आहे. या किरणांकडे माणूस उघड्या डोळ्यांनी बघू शकत नाही. त्यांच्यामुळे मोतीबदू तसंच डोळ्यांच्या कॅन्सरचा धोका वाढतो. पृथ्वीपासून मंगळ ग्रह जवळपास १४ कोटी मैल आहे. चंद्रावर जाण्यासाठी अंतराळवीरांना तीन दिवस प्रवास करावा लागतो. पण मंगळापर्यंत पोहोचण्यासाठी काही महिने लागू शकतात. एवढा वेळ अंतराळात घालवणं हे मोठं आव्हान असू शकतं. कितीही प्रशिक्षण दिलं तरी अंतराळवीरांना काही काळानंतर अडचणी येऊ लागतात. म्हणूनच मंगळावर माणूस पाठवण्याच्या मोहिमेसाठी नासा विनोदवीरांचा शोध घेते आहे! यामुळे म्हणे अंतराळवीर तणावमुक्त राहू शकतील...



## कॅटलिनचं चालतं फिरतं घर

स्कॉटलंडमधल्या एका विद्यार्थिनीने घरभाड्याला कंटाळून चालतंफिरतं घर बनवून टाकलं. तिच्या या कल्पनेचं सर्वच स्तरातून कौतुक होत आहे. २५ वर्षांची कॅटलिन मॉ विद्यार्थिनी आहे. स्कॉटलंडमधल्या एका घरात राहण्यासाठी ती महिल्याला २५० पाउंड भाडं देत होती. २५० पाउंड म्हणजे जवळपास २३,४०३ रुपये. घराचं भाडं सतत वाढत होतं. घरभाडं, वीजबिल तसंच इतर खर्चांमुळे कॅटलिनचं दिवाळं निघत होतं. मग तिने एक शक्कल लढवली. कॅटलिनने एक व्हॅन विकत घेतली आणि आता या व्हॅनलाच ती घराचा लूक देते आहे. तिने ३५ वर्षांपूर्वीची एक व्हॅन तीन हजार पाउंडांना विकत घेतली. या व्हॅनमध्ये बदल करून घरासारखं सजवण्याचा तिचा प्रयत्न आहे. घरभाडं म्हणून महिन्याला २५० पाउंड देण्यापेक्षा एका व्हॅनचं घरात रुपांतर करून त्यात राहणं तिला योग्य वाटतं. कॉलेज आणि इतर कारणांसाठी कॅटलिन बराच काळ घराबाहेर असते. फक्त रात्री झोपण्यासाठी घरात यायचं आणि त्यासाठी २५० पाउंड खर्च करायचे हे तिला योग्य वाटत नव्हतं. म्हणूनच तिने ही कल्पना लढवली. आता ती या व्हॅनमध्ये छोटं स्वयंपाकघरही बसवणार आहे. शिक्षण पूर्ण झाल्यानंतर या व्हॅनमधूनच ती युरोपची भ्रमंती करणार आहे. कॅटलिनची ही शक्कल भन्नाटच म्हटली पाहिजे.



प्रेरणास्थान बाबा आमटे पुरस्कार स्वीकारताना डावीकडून आनंद साधनाचे अजित कुलकर्णी, गुरुनाथ रसाळ, सोमनाथ घाडगे, आर जे संग्राम, ममता सपकाळ, अनिकेत आमटे, गणेश चाफेकर आदी दिसत आहेत.

# अजित कुलकर्णी यांना बाबा आमटे पुरस्कार प्रदान

नगर – सौ.तृप्ती व गणेश चाफेकर यांच्या इन्स्पायर ट्राईब व प्रकाशवाटा फौंडेशन यांच्या वतीने स्वातंत्र्यदिनी पुणे येथे महामानव बाबा आमटे पुरस्कार वितरण सोहळा आयोजित करण्यात आला होता. या सोहळ्यात प्रेरणास्थान बाबा आमटे पुरस्कार दिव्यांग पुनर्वसनाचे काम १७ वर्षापासून करणारे समर्पित व्यक्तिमत्व अजित कुलकर्णी यांना प्रदान करण्यात आला. पुरस्काराचे यंदाचे ५ वे वर्ष होते. पुण्यातील कर्वे रोड येथील अंबर हॉलमध्ये या पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. लोकबिरादरी प्रकल्प हेमलकसा चे संचालक अनिकेत प्रकाश आमटे, डॉ.सिंधूताई सपकाळ यांच्या कन्या ममता सपकाळ, पुणे बिग एफ. एम. चे आर. जे. संग्राम खोपडे, सौ.तृप्ती व गणेश चाफेकर यांच्या उपस्थितीत सोहळा पार पडला. कार्यक्रमाची सुरुवात दिपप्रज्वलनाने झाली. या कार्यक्रमात प्रमुख अतिथी म्हणून अनिकेत आमटे उपस्थित होते.

या कार्यक्रमात प्रेरणास्थान बाबा आमटे पुरस्कार व आनंद साधना संस्थेच्या उद्योग केंद्रास जुनी रिक्षा घेण्यासाठी ७५ हजार रुपयांचा निधी अजित कुलकर्णी यांना सौ.तृप्ती व गणेश चाफेकर व इन्स्पायर ट्राईब व प्रकाशवाटा फौंडेशनच्या विविध देणगीदार यांचे माध्यमातून ऑनलाईन स्वरुपात सुपूर्त केल्याचे यावेळी जाहीर करण्यात आले.

समाज माध्यमातून अभिनेते श्रेयस तळपदे, नाम फाउंडेशन चे मकरंद अनासपुरे, अभिनेत्या सुकन्या मोने–कुलकर्णी, भार्गवी चिरमुले आणि जेष्ठ समाजसेवक डॉ.प्रकाश बाबा आमटे यांनी आनंद साधना प्रकल्पास मदत करण्याचे देखील आवाहन केले आहे.

या कार्यक्रमास भारतीय हवामान शास्त्रज्ञ डॉ. रंजन केळकर, कायदा अभ्यासक विवेक वेलणकर, डॉ. कल्पना सुरेश संचेती, मकरंद वैद्य उपस्थित होते. पुणे येथे शिक्षण घेणारे अनेक उच्च शिक्षित दिव्यांग अंध जन या कार्यक्रमास उपस्थित होते. आनंद साधना चे गुरुनाथ रसाळ, सोमनाथ घाडगे, विश्वनाथ नवले, संभाजी खिलारी या कार्यक्रमास उपस्थित होते.

# टेरिफ वॉरचा भारतीय उद्योजकांना फायदा

## करण विग यांचा दावा

नगर – अमेरिकेकडून भारतावर लादला जात असलेला निर्यात कर (टेरिफ) एकादृष्टीने चांगला आहे. यातून भारतीय उद्योजकांना अन्य देशातील निर्यातीच्या संधी शोधता येतील. निर्यात कर वाढल्याने भारतीय मालाच्या किमती वाढून अमेरिकेतील मागणी घटण्याची भीती असली तरी ही संधी नवे ग्राहक शोधण्याचीही आहे, हेही लक्षात घेतले पाहिजे, असे प्रतिपादन मायक्रॉन प्रिसिजन कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक करण विग यांनी येथे केले. आपल्या देशात इंग्रजी भाषिकही अनेकजण असल्याने युरोप, जर्मनी, इंग्लंड, फ्रान्स, चायना प्लस अशा देशांसह आफ्रिका खंडातही निर्यात संधी शोधताना व ती प्रत्यक्षात आणताना भारतीय उद्योजकांना भाषेची अडचण येणार नाही, असा विश्वासही विग यांनी व्यक्त केला.





नगरमध्ये तीन वर्षांपूर्वी टूल्स काउंटी हा पहिला इंडस्ट्रीयल मॉल सुरू करणारे व या माध्यमातून जिल्ह्यातील इंजिनियरिंग, ऑटोमोबाईल आणि फॅब्रिकेशन उद्योगांना आवश्यक औद्योगिक साहित्य पुरवणारे उद्योजक मिलिंद ऋषी यांनी नव्याने नगरच्या नागापूर औद्योगिक वसाहतीत श्री एंटरप्राइजेस संचलित मायक्रॉन शॉपी सुरू केली आहे. तिचे उद्घाटन संचालक करण विग यांच्या हस्ते नुकतेच झाले. यावेळी माधवी ऋषी, क्रीतिज विग, वरद राजन आदी उपस्थित होते.

नगरमध्ये तीन वर्षांपूर्वी टूल्स काउंटी हा पहिला इंडस्ट्रीयल मॉल सुरू करणारे व या माध्यमातून जिल्ह्यातील इंजिनियरिंग, ऑटोमोबाईल आणि फॅब्रिकेशन उद्योगांना आवश्यक औद्योगिक साहित्य पुरवणारे उद्योजक मिलिंद ऋषी यांनी नव्याने नगरच्या नागापूर औद्योगिक वसाहतीत श्री एंटरप्राइजेस संचलित मायक्रॉन शॉपी सुरू केली आहे. तिचे उद्घाटन संचालक करण विग यांच्या हस्ते नुकतेच झाले. यावेळी माधवी ऋषी, क्रीतिज विग, वरद राजन आदी उपस्थित होते.

रोहतक (हरियाणा) येथील मायक्रॉन प्रिसिजन कंपनी भारतातील एकमेव इंडियन मल्टीनॅशनल कंपनी मानली जाते. ही कंपनी ३ एमएम पासून ते ३८ एमएम आकारापर्यंतच्या १५ हजार प्रकारच्या नट–बोल्टचे उत्पादन करते. सुमारे ५६० कोटींचा टर्नओव्हर असलेल्या या कंपनीच्या भारतात तसेच इंग्लंड आणि जर्मनीमध्ये शाखा आहेत. घरगुती वापराच्या वस्तूंमध्ये वापरल्या जाणार्या छोट्या नट–बोल्टसह जेसीबी, ट्रक व सर्व प्रकारच्या वाहनांसाठीही मोठ्या आकाराच्या नट–बोल्ट निर्मिती केली जाते. त्यांची विविध देशात निर्यातही होते. या कंपनीचे नट बोल्ट आता श्री एंटरप्राइजेसमध्ये उपलब्ध झाल्याचे व अहिल्यानगर, सुपा, रांजणगाव, चाकण एमआयडीसीतील सुमारे ५० कंपन्यांना सर्व प्रकारचे मायक्रॉन कंपनीचे नट बोल्ट उपलब्ध करून देण्यात आले असल्याचे ऋषी यांनी सांगितले.

## नगरमध्ये सामाजिक काम करणार

सध्या मायक्रॉन कंपनी भारतात तिसऱ्या क्रमांकावर असून भविष्यात क्रमांक एकवर येण्यासाठी प्रयत्नशील आहोत. २०२७ पर्यंत चाकण येथे कंपनी उत्पादन विभाग उभारणार आहे. तसेच अमेरिका, साऊथ आफ्रिका, ऑस्ट्रेलिया, दुबई, केनिया येथेही कंपनीचा विस्तार करण्याचा मानस असल्याचे विग यांनी सांगितले. सामाजिक उपक्रम राबवण्यासाठी मायक्रॉन पृथ्वी फाउंडेशनची स्थापना करण्यात आली असून या फाउंडेशनच्यावतीने बेटी को बचाव–बेटी को सन्मान दिलाओ अभियान चालवले जाते. याअंतर्गत रोहतकमध्ये ३०० वर मुलींसाठी मोफत शिक्षणाची सुविधा दिली आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर जाऊ पाहणाऱ्या खेळाडूंना क्रीडा शिष्यवृत्ती, दिव्यांग खेळाडूंना तज्ज्ञांचे मार्गदर्शन व त्यांचा पॅरा ऑलिम्पिक क्रीडा स्पर्धांतील सहभाग वाढवण्याचा प्रयत्न सुरू असल्याचे विग यांनी सांगितले. अहिल्यानगर (अहमदनगर) शहर व जिल्ह्याचे ऐतिहासिक महत्व असल्याने या जिल्ह्यातही मायक्रॉन पृथ्वी फाउंडेशनचे सामाजिक उपक्रम राबवण्याचा प्रयत्न राहील, अशी ग्वाहीही त्यांनी दिली. श्री एंटरप्राइजेस व टूल्स काउंटी यांच्यावतीने वर्षभर राबवल्या जाणाऱ्या रक्तदान शिबीर, वृक्षारोपण, उद्योजकता विकास मार्गदर्शन आदी उपक्रमांचे त्यांनी कौतुक केले व यात मायक्रॉन कंपनीद्वारे योगदान देण्याची ग्वाही दिली.

# गणेशोत्सवापूर्वी शिक्षक–शिक्षकेतरांना वेतन द्या

**राज्योत्सवाच्या आनंदात गणेश उत्सव साजरा करण्यासाठी ऑगस्टचे वेतन आगाऊ द्यावे**

नगर – गणेशोत्सवाला राज्य शासनाने राज्योत्सवाचा दर्जा दिला असताना, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी हा उत्सव उत्साहात व आनंदाने साजरा करू शकतील यासाठी माहे ऑगस्ट २०२५ चे नियमित वेतन २५ ऑगस्टपूर्वी वितरित करण्याचा आदेश निर्गमित करण्याची मागणी महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेच्या वतीने राज्य सरकारकडे करण्यात आली आहे.



बाबासाहेब बोडखे

या संदर्भात शिक्षक परिषदेचे राज्य कार्याध्यक्ष तथा माजी शिक्षक आमदार नागो गाणार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व अजित पवार तसेच शिक्षण मंत्री दादाजी भुसे, शिक्षण सचिव रणजीतसिंह देओल, शिक्षण आयुक्त सचिंद्र प्रतापसिंह यांना निवेदन पाठविले असल्याची माहिती शिक्षक परिषदेचे जिल्हाध्यक्ष बाबासाहेब बोडखे यांनी दिली.

महाराष्ट्राचे दैवत आणि विद्येची देवता असलेले गणपती बाप्पा यांच्या आगमनाची सर्वत्र तयारी सुरू असून यंदा २७ ऑगस्टपासून गणेशोत्सव प्रारंभ होणार आहे. हा उत्सव महाराष्ट्रातील प्रत्येक घराघरात उत्साहात व श्रद्धापूर्वक साजरा केला जातो. या पार्श्वभूमीवर शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आपापल्या कुटुंबासमवेत हा उत्सव समाधानाने साजरा करू शकतील, यासाठी वेतन वेळेत मिळणे अत्यावश्यक आहे, असे परिषदेच्या निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे.

शासनाने गणेशोत्सवाला राज्योत्सवाचा दर्जा दिल्याबद्दल शिक्षक परिषदेच्या वतीने सरकारचे अभिनंद करण्यात आले आहे.तथापि, शिक्षक–शिक्षकेतरांच्या घरगुती तयारीसाठी आर्थिक तरतूद होणे गरजेचे असल्याने माहे ऑगस्ट २०२५ चे वेतन २५ ऑगस्टपूर्वी वितरित करण्याचे आदेश तात्काळ निर्गमीत करण्याची मागणी शिक्षक परिषदेच्या वतीने करण्यात आली आहे. राज्योत्सवाच्या आनंदात गणेश उत्सव साजरा करण्यासाठी ऑगस्टचे वेतन आगाऊ मिळणे गरजेचे असल्याची भावना बाबासाहेब बोडखे यांनी व्यक्त केली आहे.

# राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार गटाची नगरमध्ये २१ ऑगस्टला 'जिल्हा बैठक'

**उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा २९ ऑगस्टला जिल्हा दौरा**

नगर – राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या जिल्हा व शहर पदाधिकाऱ्यांच्या बैठकीचे आयोजन पक्षाचे जिल्हाध्यक्ष अशोकराव सावंत यांच्या अध्यक्षतेखाली २१ ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता अहिल्यानगरच्या शासकीय विश्रामगृह येथे करण्यात आले आहे. या बैठकीत येणाऱ्या काळात होणाऱ्या जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि महानगरपालिका निवडणुकांच्या नियोजनासाठी आणि २९ ऑगस्ट रोजी श्रीगोंदा येथे पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष व उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत होत असलेल्या मेळाव्याच्या यशस्वी नियोजनासाठी बैठकीत विचारविनिमय होणार आहे, अशी कार्यालयीन सचिव साईनाथ भगत यांनी दिली.

या बैठकीस आमदार संग्राम जगताप, आमदार काशिनाथ दाते, माजी आमदार चंद्रशेखर घुले, राहुल जगताप, पणन महामंडळाचे अध्यक्ष दत्तात्रय पानसरे, मार्केटिंग फेडरेशनचे अध्यक्ष बाळासाहेब नाहाटा, श्रीगोंदा साखर कारखान्याचे अध्यक्ष राजेंद्र नागवडे, राहुरी साखर कारखान्याचे अध्यक्ष अरुण तनपुरे व पक्षातील सर्व ज्येष्ठ नेते, पदाधिकारी यांच्यासह जिल्हा कार्याध्यक्ष संजय कोळगे, शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर, महिला अध्यक्षा आशा निंबाळकर, युवक अध्यक्ष संतोष धुमाळ उपस्थित राहणार आहेत. या बैठकीला पक्षाचे जिल्हा उपाध्यक्ष, जिल्हा सरचिटणीस, चिटणीस, तालुकाध्यक्ष, महिला, युवक, युवती आणि पदाधिकाऱ्यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन साईनाथ भगत यांनी केले आहे.

# सावित्रीबाई फुले व्यापारी संकुलातील गाळेधारकांकडे थकबाकी वसुलीसाठी महानगरपालिकेकडून जप्ती कारवाईच्या नोटीसा

**तत्काळ संपूर्ण थकबाकी न भरल्यास गाळे ताब्यात घेणार : आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे**

नगर – शहरातील महानगरपालिकेच्या टीव्ही सेंटर येथील सावित्रीबाई फुले फेज १ व फेज २ या व्यापारी संकुलातील थकबाकीदार ४५ गाळेधारकांवरही कारवाई सुरू करण्यात आली आहे. या गाळेधारकांकडे ८०.६९ लाख रुपयांची थकबाकी असून, तत्काळ संपूर्ण थकबाकी न भरल्यास गाळे ताब्यात घेण्यात येतील, असा इशारा आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी दिला आहे.

महानगरपालिका प्रशासनाने गाळेधारकांना वारंवार सूचना देऊनही थकबाकी भरण्यासाठी प्रतिसाद मिळालेला नाही. बहुतांश गाळेधारकांचे करारनामे संपुष्टात आले आहेत. त्यामुळे थकीत रक्कम तत्काळ न भरल्यास गाळे जप्त करून ताब्यात घेण्यात येणार असल्याचेही आयुक्त तथा यशवंत डांगे यांनी स्पष्ट केले आहे.



माळीवाडा येथे नव्याने सुरू झालेल्या श्रीकृष्ण क्लिनिकचे उद्घाटन करताना श्रीमती लता बारटक्के. समवेत संचालक डॉ. केशव बारटक्के, ॲड. चंदन बारटक्के आदी.

# श्रीकृष्ण क्लिनिकचे उद्घाटन

नगर – विशाल गणपती मंदिर माळीवाडा येथे श्रीकृष्ण क्लिनिकचे उद्घाटन श्रीमती लता बारटक्के यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी संचालक डॉ. केशव बारटक्के, ॲड.चंदन बारटक्के, ॲड.संदीप काळे, ॲड.गोविंद बारटक्के, राजेश हेंद्रे, अमोल बारटक्के, हर्ष बारटक्के, आशा हेंद्रे, सुमन बारटक्के, मंगल बारटक्के, वैशाली हेंद्रे, सारिका हेंद्रे, अर्पिता हेंद्रे आदी उपस्थित होते.

यावेळी डॉ. केशव बारटक्के म्हणाले, हे क्लिनिक रुग्णांच्या सेवेसाठी असून परिसरातील नागरिकांनी चांगली सेवा सुविधा देण्यावर माझा भर राहिल तसेच रुग्णांवर चांगले उपचार करुन त्यांना बरे करण्यावर लक्ष राहिल असे त्यांनी सांगितले. यावेळी अनेक रुग्णांनी तपासणी करुन घेतली.

# रोटरी क्लब ऑफ अहमदनगर सेंट्रलतर्फे सायकल, शिवणयंत्रे, वेंडिंग मशिन्स व इंसीनरेटरचे वाटप

नगर – रोटरी क्लब ऑफ अहमदनगर सेंट्रलच्या वतीने समाजोपयोगी सेवा प्रकल्प राबविण्यात आला. या उपक्रमांतर्गत ११ सायकली, ११ शिवणयंत्रे, ११ वेंडिंग मशिन्स व ११ इंसीनरेटर यांचे वितरण करण्यात आले. क्लबचे अध्यक्ष रोटेरियन सुनील कटारिया यांनी प्रास्ताविक केले.



रोटरी क्लब ऑफ अहमदनगर सेंट्रलतर्फे सायकली, शिवणयंत्रे, वेंडिंग मशिन्स व इंसीनरेटरचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी क्लबचे अध्यक्ष रोटेरियन सुनील कटारिया आदी.

सहायक प्रांतपाल मधुरा झावरे यांनी उपक्रमाचे कौतुक केले.

जिल्हा फर्स्ट लेडी रोटेरियन संगीता लातूरे यांनी महिलांसाठी राबविण्यात येत असलेल्या उपक्रमाचे अभिनंदन केले.

मुख्य अतिथी जिल्हा प्रांतपाल रोटेरियन सुधीर लातूरे यांनी क्लबच्या उपक्रमांचे कौतुक करून सर्व रोटरी क्लब्स व दात्यांनी रोटरी फाउंडेशनसाठी उदारतेने दान द्यावे, असे आवाहन केले.

तसेच या कार्यक्रमात अवयव दान जनजागृती अंतर्गत सिव्हिल हॉस्पिटलचे जिल्हा समन्वयक सतीश अहिरे यांनी सर्वांना अवयव दान संबंधित शपथ दिली.

या सोहळ्यास जिल्हा प्रांतपाल रो. सुधीर लातुरे, जिल्हा फर्स्ट लेडी सौ. संगीता लातुरे, सहायक प्रांतपाल रो. मधुरा झावरे, क्लबचे पास्ट डिस्ट्रिक्ट गव्हर्नर रो. शिरीष रायते, डिस्ट्रिक्ट गव्हर्नर नॉमिनी रो. क्षितिज झावरे, पास्ट डिस्ट्रिक्ट गव्हर्नर रो. प्रमोद पारीख, सहाय्यक प्रांतपाल रो.ईश्वर बोरा, सर्व जिल्हा संचालक, विविध क्लबचे अध्यक्ष, सचिव, रो. डॉ. श्रीकृष्ण जोशी, रो.नरेंद्रभाई चोरडिया, रो.मनीष बोरा, रो.प्रसन्न खाजगीवाले, रो. अमर गुरप (सचिव), रो.सुजाता कटारिया, रो.श्रेया खाजगीवाले, रो. हरीश नय्यर, रो. हितेश गुप्ता, रो. निलेश शाह, रो. चेतन अमरापूरकर, रो. राजेश परदेशी, रो. सुनील मुथा, रो. संजय मुनोत, रो. वसंत मुनोत रो. विनोद भंडारी, रो.डॉ.दिलीप बागल, रो. डॉ. उज्वला शिरसाठ, क्लबचे ॲनस ॲनेट्स उपस्थित होते. तसेच विविध शाळा आणि संस्थांचे पदाधिकारी व लाभार्थीही उपस्थित होते.

क्लबचे सचिव रोटेरियन अमर गुरप यांनी आभार मानले.



सकल नाभिक समाजाच्या वतीने संत सेना महाराज यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली. (छाया – विजय मते)

# सकल नाभिक समाजातर्फे संत सेना महाराज पुण्यतिथी साजरी

नगर – अहिल्यानगर शहरात सकल नाभिक समाजाच्या वतीने नाभिक समाजाचे आराध्य दैवत संतश्रेष्ठ श्री संत सेना महाराज यांची ६६८ वी पुण्यतिथी भक्तिमय वातावरणात साजरी करण्यात आली. यावेळी समाज बांधव उपस्थित होता. शहरातील पानसरे गल्लीत, नगरकर नाभिक पंचाचा वाडा येथे श्री संत सेना महाराज मूर्तीला सकाळी अभिषेक करून विधिवत पूजा– अर्चा करण्यात आली. भजन, आरती झाल्यानंतर शहरातून भव्य सजविलेल्या रथामधुन श्री संत सेना महाराज यांच्या प्रतिमेची मिरवणूक काढण्यात आली होती.

मिरवणुकीच्या प्रारंभी श्री संत सेना महाराज यांना सकल नाभिक समाजाच्या वतीने अभिवादन करण्यात आले. नंतर मिरवणुकीस प्रारंभ झाला. या मिरवणुकीमध्ये सनई चौघडा, ढोल पथक, बँड पथक हे मुख्य आकर्षण ठरले. पानसरे गल्लीतून ही मिरवणूक अर्बन बँक, भिंगारवाला चौक, कापड बाजार, नेता सुभाष चौक, चितळे रोड मार्गे जात असताना चौका – चौकात श्री संत सेना महाराज यांच्या प्रतिमेस भाविकांनी पुष्पहार अर्पण करून दर्शन घेतले. आमदार संग्राम जगताप हे देखील मिरवणुकीत सहभागी होऊन सेना महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. चितळे रोड येथील ऋग्वेद भवन येथे मिरवणुकीची सांगता झाली.

यावेळी उपस्थित भाविकांना महाप्रसादाचा लाभ देण्यात आला. शिस्तबद्ध मिरवणूक पार पडताना सर्व बांधवांनी वाहतुकीचे नियम पाळून वाहतूक कोंडी होऊ न देता मिरवणूक पार पाडल्याबद्दल नागरिकांनी धन्यवाद दिले.

# रमेश फिरोदिया कॉलेज ऑफ आर्किटेक्चरमध्ये प्रमोद कांबळे यांची 'विद्यार्थ्यांसाठी कार्यशाळा'

नगर – अहिल्यानगर येथील रमेश फिरोदिया कॉलेचे ऑफ आर्किटेक्चर या महाविद्यालयात १५ ऑगस्ट रोजी ७९ वा स्वातंत्र्य दिन चित्र–शिल्पकार प्रमोद कांबळे यांच्या प्रमुख अतिथी उपस्थितीत साजरा करण्यात आला. याप्रसंगी बोलताना प्रमोद कांबळे यांनी विद्यार्थ्यांनी सतत कामाचा ध्यास घेऊन आपले काम अधिकाधिक गुणवत्ता पूर्ण कसे होईल, याकडे विशेष लक्ष देण्याचे आवाहन केले व विद्यार्थ्यांशी विशेष हितगुज करतांना, त्यांचा जीवन प्रवास उलगडतांनाच निरीक्षण, ड्रॉईंगचे तसेच डिटेलिंगचे महत्त्व विद्यार्थ्यांसमोर विविध चित्रे काढून दाखवून समजावून सांगितले. तसेच त्यांनी पेन्सिल स्केचचे महत्व सांगतानाच १५ मिनिटामध्ये हुबेहूब पोर्ट्रेट स्केच काढून दाखवले. हे पोर्ट्रेट पाहून विद्यार्थाना आनंद वाटलं तसेच त्यांनी आजपर्यंत निर्माण केलेल्या स्कल्प्चर्स संबंधीची रंजक माहिती, विविध प्रसंग, आलेल्या अडचणींसंदर्भात सुमारे दोन तास विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून, विद्यार्थ्यांनी केलेल्या कामांचे कौतुक केले.



रमेश फिरोदिया कॉलेचे ऑफ आर्किटेक्चर महाविद्यालयात चित्र–शिल्पकार प्रमोद कांबळे यांच्या उपस्थितीत स्वातंत्र्य दिन साजरा करण्यात आला.

प्रास्ताविक कु. धनश्री मुथियान हिने केले तर कु. यासिरा तांबटकर हिने स्वातंत्र्य दिनाचे महत्त्व व इतिहास विशद केला. प्राचार्य आर्की. सुहास चौधरी यांनी स्वातंत्र्य दिनाचे औचित्य तसेच स्वातंत्र्याची अपेक्षा करताना जबाबदारीचे सुध्दा भान असावे असे सांगितले. संस्थेचे विश्वस्त सी ए रमेश फिरोदिया यांनी प्रमुख अतिथींचा सत्कार केला. कु. गायत्री तागड हिने आभार मानले.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

